दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -१३८ गुरूवार,दि.२३ जानेवारी २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-138 | Thursday, Dt.23 January 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4




बीड - हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त भगव्या सप्ताहाचे बीड जिल्ह्याच्या ग्रामदेवतांना पूजा व अभिषेक करून शुभारंभ नितीन भैया धांडे यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्री क्षेत्र नगद नारायण व बीड जिल्ह्याचे ग्रामदैवत श्री नामलगाव गणपती येथे अभिषेक करण्यात आला.

# आणखी एका बीडकर सुकन्येनं अभिमानास्पद कामगिरी केली



- दिल्लीतील राजपथावर परेड कमांण्डर म्हणून निवड.
- कु.दामिनी ची एअरफोर्समध्ये पायलट म्हणून देशसेवा
- कु.दामीनीनं बीडचं नाव देशभर रोशन केलं
- तत्कालीन चॅरिटी कमिशनर न्या.दिलीप देशमुख यांच्या कन्येची देशभर किर्ती
- ऊस तोडणी कामगारांचा नाही तर कर्तृत्ववान युवकांचाही बीड जिल्हा..



**वडवणी/प्रतिनिधी**

**खो-खो वर्ल्डकपवर कु.प्रियंका इंगळे या बीडकर कन्येनं आपला ठसा उमटविला आहे.आता आणखी एका बीडकर सुकन्येनं सर्वांना अभिमान वाटावा अशी कामगिरी करून बीडचे नाव देशभर रोशन केले आहे.**

**बीड जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यातील देवडी गावची मुळ रहिवासी असलेली कु.दामिनी दिलीप देशमुख हीची २६ जानेवारी रोजी म्हणजे प्रजासत्ताक दिनी दिल्लीतील राजपथावर होणाऱ्या परेडसाठी परेड कमांण्डर म्हणून निवड झाली आहे. कु.दामिनी एअरफोर्स मध्ये पायलट म्हणून देशसेवा करीत आहे. परेडसाठी कमांडर म्हणून नेतृत्व करण्याची संधी मिळणे हा बहुमान आहे.. ती संधी कु.दामिनीला मिळाली याचा देशमुख देवडीकर कुटुंबीय आणि तमाम बीड जिल्ह्याला व महाराष्ट्राला नक्कीच अभिमान आहे. कु.दामिनीचे वडिल न्या. दिलीप देशमुख हे पुणे विभागाचे चॅरिटी कमिशनर म्हणून नुकतेच निवृत्त झाले आहेत. कु.दामिनी ही अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांची पुतणी आहे. खरंच कु.दामिनी चा आम्हा बीड करांना सार्थ अभिमान आहे. बीड करांच्या वतीने डोंगरचा राजा च्या माध्यमातून कु.दामिनीचे मनापासून अभिनंदन.**

काहींनी बीडचे नाव देशभर बदनाम केले आहे. मात्र बदनामीचा हा शिक्का पुसून काढण्यासाठी बीडची युवाशक्ती पुढे येत आहे हे पाहून निश्चित सर्वांना आनंद होत आहे. बीड मध्ये अनेक सकारात्मक गोष्टी घडत असतात. मात्र त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. नकारात्मक बातम्यांना जास्त प्रसिध्दी मिळते. अशा वातावरणात कु.प्रियंका असेल किंवा कु.दामिनी यांचं कर्तृत्व अधिक उठून दिसते.

बीड जिल्हा केवळ ऊस तोडणी कामगारांचा जिल्हा नाही तर कर्तृत्ववान युवकांचाही जिल्हा आहे. ही नवी ओळख आता निर्माण होत आहे.याचा निश्चितच आपल्या सर्वांना आनंद आहे.

बीड जिल्हा हा विविध संघटनेच्या, विविध खेळांच्या आणि वेगवेगळ्या विधायक कार्याच्या बाबतीत महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. जेंव्हा एखाद्या घटनेचे पडसाद महाराष्ट्रभर पडतात. त्या घटनेची पायाभरणी ही बीड जिल्हातच असते. परंतु गेल्या काही महिन्यापासून मस्साजोग प्रकरणात सरपंचाची निघूर्ण हत्या आणि राजकारण्यांना गोवण्याचा एक कल्मी अठ्ठाहास. यामुळे सतत केवळ बीडचं अस्स...अन् बीडचं तसं... अमक्याचे अस..व तमक्याचं तसं..म्हणून बदनामीच्या कटहारात केवळ बीड जिल्ह्याला उभं केलं जात आहे.

या दोन्ही घटनेच्याही पलिकडे जाऊन सकारात्मक दृष्टीनं विचार करण्याची गरज आहे.

बीड जिल्ह्यातला अतिमागास म्हणून गणाला जात असलेला तालुका म्हणजे वडवणी तालुका या तालुक्यातील छोट्याशा देवडी गावची मुळ रहिवासी असलेली कु.दामिनी दिलीप देशमुख ही कन्या फ्लाइंग ऑफिसर म्हणून देशाच्या वायुदलात अतिउच्चपदी विराजमान झालेली आहे.

बीड जिल्ह्यातील महिला मुली राजकिय, सामाजिक ,वैद्यकिय अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. कु.दामिनी देशमुख या मुलीने एका नविन क्षेत्रात पदार्पण करून बीड जिल्ह्याचे नाव उज्वल करून आपल्या कर्तुत्वाची मुद्रा ,पताका फडकवण्याचे अभिनव कार्य याच दामिनीने केलेलं आहे. व करत आहे. दामिनीने जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर सन २०१९ मध्ये देशपातळीवर घेण्यात आलेल्या कॉमन अडमीस्ट्रेट या खडतर परीक्षेत देशभरातील दिड लाख उमेदवारामधून गुणवत्ता यादीमध्ये येत अभिनव व दैदिप्यमान यश संपादन करून तिची एअर फोर्समध्ये फ्लाईंग ऑफिसर म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे या दामिनीने आपल्या आवडत्या क्षेत्रात करीअर करण्यासाठी शासनाची मीळत असलेल्या उच्च शिक्षणासाठीची शिष्यवृत्तीही सोडून दिली.

ही बीड जिल्हयाची दामिनी केवळ फ्लाईंग आफिसरच नव्हे तर अश्वारोहन, कराटे, योगा, धनुर्विद्या, रायफल सुटिंग, तसेच खो-खो, व्हॉलिबॉल अशा विविध उपक्रमात अग्रेसर आहे. ती कराटे खेळात ब्लक बेल्टमध्ये गोल्ड मेडलिस्ट आहे. अशा या दामिनीची २६ जानेवारी २०२५ मध्ये होत असलेल्या प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहना प्रसंगी विमानातून पुष्पवृष्ठी करण्यासाठी या बीड जिल्ह्याच्या कन्येची निवड म्हणजे अखिल बीड जिल्ह्याची गर्वाने मान ताठ होईल अशा प्रकारचा हा प्रसंग.

बीड जिल्हयालाची बदनामी थांबविणे ही गरज होऊन बसलेली आहे. आपल्या भारताचे महामहिम राष्ट्रपती व प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहन होत असताना त्यांच्यावर पुष्पवृष्ठी करण्याचे बीड जिल्हयातील दामिनीला सद्भाग्य मीळत असेल तर बीडचा...झालाय, बीडचा..होईल.! बीडचे नावच..नामशेष होईल अशा वल्गना करणाऱ्यांना या गोष्टी कोण लक्षात आणून देईल.!!

बीड जिल्ह्याच्या बाबतीत दुसरी उल्लेखनिय घटना म्हणजे अति ग्रामीण खेड्यातील कळमअंबा तालुका केज येथील कु. प्रियंका इंगळे ही उच्च माध्यमिकमध्ये शिक्षण घेणारी कु. प्रियंका भारतीय खो-खो संघाचे कॅप्टन म्हणून नेतृत्व करते. एवढेच काय या नेतृत्वाची झलक अख्ख्या देशाला दाखवते. तिने तिच्या नेतृत्वात खो-खो, मध्ये विश्वचषक जिंकून इतिहास घडवला.

असे अष्टपैलू हिरे बीड जिल्ह्याचे नाव रोशन करत आहेत आणि आपण मात्र स्वतःच्या स्वार्थासाठी बीडला...शेजारी बसवताय हे आपण केव्हा संपवणार.! याचा विचार करण्याची वेळ आली आहे. दामिनी देशमुख हिचं करावे तेवढे कौतुक कमीच आहे.. चला तर मग दामिनी ला देखील शुभेच्छा देऊयात..

## जिल्ह्यातील गुन्हेगारी आणि माफियागिरी मोडुन काढणार



**पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत**

बीड । प्रतिनिधी

जिह्यातील सर्व अवैध धंदे बंद करण्याचे आदेश जिल्हयातील सर्व प्रभारी ठाणेदरांना देण्यात आले आहेत. कोठे काही चालु असल्यास याची माहिती दिल्यास तात्काळ कठोर पावले उचलुन कारवाई केली जाईल. जिल्ह्यातील संघटित गुन्हेगारी मोडुन काढण्यासाठी नियोजनपूर्वक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली.

यासंदर्भात बोलतांना नवनीत कॉवत म्हणाले, बीड जिल्ह्यात फेक गुन्हे दाखल करण्यासाठी प्रवृत्त केले जाते. सदर खोटे गुन्हे दाखल होऊ नयेत. गुन्हे दाखल झाल्यानंतर चौकशीमध्ये गुन्हा खोटा

(उर्वरीत पान २ वर)

### मोक्का अंतर्गत कारवाई करणार

जिह्यातील सर्व गुन्हेगारांची माहिती अद्यावत करण्यात येत आहे. गुन्हे रजिस्टर तयार करुन हद्दपार, संघटित गुन्हेगारी आणि मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यासाठी प्रस्ताव करून गुन्हेगारीवर जरब निर्माण करण्यात येणार आहे, असेही पोलीस अधीक्षक यांनी सांगितले.

## सातव्या एकता साहित्य संमेलनात दीपक महाले यांचे व्यंगचित्र प्रदर्शन



मानूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरी,दहिवंडी येथे शनिवारी नुकतेच दोन दिवसीय सातवे एकता मराठी साहित्य संमेलन पार पडले.या संमेलनात व्यंगचित्रकार दीपक महाले यांच्या सामाजिक विषयावरील व्यंगचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.संमेलनाध्यक्षा डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.हेल्मेटचा वापर,पाणी प्रश्न,मोबाईलचे दुष्परिणाम,वृक्षतोड, पर्यावरणाची हानी,व्यसनाधीनता,शौचालयाची आवश्यकता इत्यादी सामाजिक विषयांवरील व्यंगचित्रे प्रदर्शित करण्यात आली होती.गंभीर विषयांवरील विनोदी व्यंगचित्रांनी रसिकांना हसवत अंतर्मुख केल्याचे दिसून आले.व्यंगचित्रातून दिलेल्या संदेशांचे स्वागताध्यक्षा ड.भाग्यश्री ढाकणे यांनी स्वागत केले.महादेव जायभाये,कवी बाळासाहेब कोठुळे,कवी देविदास शिंदे,कवी राहुल

## पोलीस असल्याचे सांगून १ लाख २० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लांबविले,केज येथील घटना



केज/प्रतिनिधी

आम्ही पोलीस असून तुमच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून ठेवा असे म्हणून महिलेला दागिने काढण्यास सांगून हातचलाखीकरून १लाख २० हजार रुपये किमतीचे मिनी गंठण व कानातील झुंबर हे दागिने घेवून पोबारा केला आहे.या बाबतची सविस्तर माहिती अशी की,दिनांक २२ जानेवारी रोजी सकाळी ११-०० वाजण्याच्या सुमारास रामकुंवर उर्फ अनिता शंकर राऊत वय ५० वर्ष ही महीला केज-कळंब रोड लगत असलेल्या साई नगर येथील धुणी-भांड्याचे काम आटोपून विठाई पुरमकडे जात असताना लोहीया

(उर्वरीत पान २ वर)

## आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवारांची भेट



मुंबई (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.२२) रोजी मुंबई येथे भेट घेतली. यावेळी आ.क्षीरसागर यांनी बीडच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल

(उर्वरीत पान २ वर)

## भारतपर्व महोत्सवात असणार 'मधाचे गाव' संकल्पनेवर आधारित चित्ररथ

लाल किल्ला परिसरात भारत पर्व महोत्सवाचे आयोजन प्रजासत्ताक दिनानिमित्त होणार असून या ठिकाणी महाराष्ट्रा राज्याचा 'मधाचे गाव' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ असणार आहे. दरवर्षी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या वतीने लाल किल्ला येथे भारतपर्व महोत्सवाचे आयोजन प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यानिमित्त केले जाते. यावर्षी या महोत्सवात महाराष्ट्राचा




चित्ररथ दर्शविण्यात येणार आहे. महाराष्ट्रासह बारा राज्यातील चित्ररथ ही इथे असणार आहेत. दिनांक २६ ते २९ जानेवारी दरम्यान भारतपर्व महोत्सव चालेल.हे वर्ष संविधानाचे अमृत महोत्सव वर्ष म्हणून साजरे केले जात असून, यावर्षी चित्ररथांसाठी 'सुवर्ण भारत: वारसा आणि विकास' ही मध्यवर्ती संकल्पना आहे. या संकल्पने च्या

(उर्वरीत पान २ वर)

## चंपावती महोत्सव ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत सर्व शाळांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे- जगताप, मुळूक, गलधर

**उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना महोत्सवाचे निमंत्रण!**

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षीच्या अफाट यशानंतर जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत यावर्षी नृत्य, नाट्य,



संगीत, चित्रकला, रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. राज्याच्या आणि देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. ही ओळख भविष्यात अबाधित राखण्यासाठी साहजिकच नवं कलाकारांची पिढी समृद्ध होणं गरजेचे आहे.

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# कष्टाची बरी तूप–साखर ती!

एकीकडे केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाची घोषणा केली असताना महाराष्ट्रातील राजपत्रित अधिकारी महासंघाने आदर्श वर्तनाची दशसूत्री जाहीर करावी; हा विलक्षण योगायोग आहे. ही दशसूत्री व्यापक आणि आदर्श असून ती अमलात आली तर 'रामराज्या'चा अनुभव महाराष्ट्रातच येईल!

एकीकडे केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाची घोषणा केली असताना महाराष्ट्रातील राजपत्रित अधिकारी महासंघाने आदर्श वर्तनाची दशसूत्री जाहीर करावी; हा विलक्षण योगायोग आहे. ही दशसूत्री व्यापक आणि आदर्श असून ती अमलात आली तर 'रामराज्या'चा अनुभव महाराष्ट्रातच येईल! महासंघाच्या नव्या मोहिमेचा मंत्र 'पगारात भागवा...' असा आहे. म्हटले तर ही किती साधी अपेक्षा. सगळ्यांनाच आपापल्या प्रामाणिक उत्पन्नात राहावे लागते व कधी खर्च वाढला तर कर्ज काढावे लागते.

लाखो शेतकरी तर बिचारे सदैव कर्जबाजारी असतात. त्यांचे उत्पन्न व खर्च यांचा कधी मेळच बसत नाही. भारत महासत्ता बनणार असला तरी आजही काही कोटी कुटुंबे रोज शंभर ते दीडशे रुपयांमध्येच गुजराण करतात, कोट्यवधी अर्धपोटी निजतात. असे असताना कित्येक सरकारी अधिकाऱ्यांचे त्यांच्या पगारात का बरे भागत नसेल? अलीकडे, वेतन आयोग नेमण्याबाबत कुचराई होत नाही आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी ऐतिहासिक संप करून आपले वेतनमान कायमचे केंद्रीय कर्मचाऱ्यांशी जोडले आहे. मग 'पगारात भागवा–कार्यसंस्कृतीची दशसूत्री' राजपत्रित अधिकारी महासंघाला का जाहीर करावी लागली असावी? या दशसूत्रीतील कलमे शंभर टक्के प्रामाणिकपणा, पारदर्शकता, नागरिकांना उत्तम सेवा, सचोटी, मोहावर विजय, नकारात्मकतेला नकार, सत्याची कास... या मूल्यांचा जागर करतात. अशी दशसूत्री जारी केल्याबद्दल महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदनच करायला हवे. मात्र, संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर ६५ वर्षांनी 'नागरिकांची कामे लाच न मागता करा,' असे सांगायला लागावे, यावरून नोकरशाही वरपासून खालपर्यंत कशी सडली व भ्रष्टाचाराने पोखरली आहे; हेच दिसत नाही का? यात केवळ राजपत्रित अधिकाऱ्यांचा दोष नसून इतरही अधिकारी, कर्मचारीही याच श्रेणीत मोडतात.

भ्रष्टाचाराचा विषय निघाला की राजकीय नेत्यांकडे, खर्चीक निवडणुकांकडे आणि नेत्यांनी काबीज केलेल्या कंत्राटखेळाकडे लक्ष वेधले जाते. ते बरोबरही आहे. मात्र, कनिष्ठ व वरिष्ठ नोकरशाहीने आपल्या पाठीचा कणा ताठ का ठेवू नये, हा खरा प्रश्न आहे. या दशसूत्रीमध्ये या मुद्द्याला हात घातला आहे. 'सचोटी हीच आपली शक्ती ठरेल आणि या सचोटीच्या बळावर संकटांचा सामना करता येईल...' असे तीत म्हटले आहे. एखादा निर्णय अनैतिक, अनुचित किंवा लोकद्रोही असेल तर नेत्यांसमोर ठामपणे 'नाही' असे म्हणण्याची हिंमत असणारे नोकरशहा ज्या दिवशी वाढतील, त्या दिवशी चित्र बदलेल. अंदाधुंद स्वार्थाला तिलांजली दिल्याशिवाय हे होणार नाही.

देशभरात आज नोकरशाही व राजकीय नेतृत्व यांची अत्यंत अभद्र व लोकविरोधी युती थैमान घालते आहे. महाराष्ट्राच्या लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या वेबसाइटला भेट दिली तर किती वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे राजपत्रित व इतरही कर्मचारी करतात, याची कल्पना येईल. एकूण भ्रष्ट व्यवहारांपैकी किती प्रकरणात तक्रारी गुदरल्या जातात, किती तडीस जातात, कितींमध्ये कारवाई होते आणि किती प्रकरणांमध्ये दोषी अधिकाऱ्यांना पुन्हा कामावर रुजू घेतले जाते, हे पाहिले तर घोर निराशा पदरी येईल. राजपत्रित अधिकाऱ्यांच्या महासंघाने केवळ उपदेशाचे अमृत न पाजता अशा प्रकरणांमध्ये ठाम भूमिका घ्यावी.

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम - शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

बीड /प्रतिनिधी

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यामध्ये विवीध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येत आहे.असे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सांगितले आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २३/१/२०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिक त्यांना मानवंदना करतील व यानंतर



वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स संभाजी महाराज चौक या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांच्या आयोजना खाली ऊसतोड कामगार भगिनींना साडी वाटप, विविध प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णांना फळ वाटप, विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे..उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर व शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे यांच्या आयोजित शिरूर येथे रांगोळी स्पर्धा व गोरगरीब महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेऊन साड्या वाटप करण्यात येणार आहेत.

पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक तात्या पवार यांच्या आयोजित तालुका पाटोदा आंबेवाडी व हांडेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये सकाळी अकरा वाजता शालेय साहित्य वाटप होणार आहे.

आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत यांच्या आयोजित आष्टी येथे मुख व बधिर वस्तीगृहामधील सर्व विद्यार्थ्यांना सकाळी ११:३० वाजता अल्पउपहार देण्यात येणार आहे.

युवासेना माजलगाव जिल्हा युवाधिकारी प्रदीपजी तांबे यांच्या आयोजित माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना सकाळी ११ वाजता फळ वाटप.

धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ यांच्या आयोजित धारूर येथील शासकीय रुग्णालयात सकाळी ११:३० वाजता रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आहे.युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे यांच्या आयोजित वडवणी मोरेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही पेन वाटप करण्यात येणार आहे.

शिवसेना जिल्हा संघटक रतन तात्या गुजर व शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांच्या आयोजित बीड शहरातील भगवान विद्यालय शेजारी ध्येयपूर्ती गुरुकुल येथे २० तारखेपासून सुरू असलेल्या वकृत्व स्पर्धा, रनिंग स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,अशा अनेक स्पर्धांचे बक्षीस उद्या दिनांक २३ रोजी सायंकाळी ७ वाजता वितरण करून सर्व विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था केली आहे.

याबरोबरच बीड जिल्ह्यातील व आष्टी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध ठिकाणी समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे,या सर्व कार्यक्रमाला शिवसेना,युवा सेना महिला आघाडी,किसान सेना,शिक्षक सेना सह सर्व अंगिकृत संघटनांच्या आजी-माजी पदाधिकारी व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे.

# १३ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत जंत निर्मुलन पंधरवडा

बीड । प्रतिनिधी

लाळखुरकुत लसीकरण फेरी-६ च्या प्रभावी अंमलबजावणी करिता दि.१३ जानेवारी ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत ''जंत निर्मुलन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळखुरकुत लसीकरण फेरी-६ च्या प्रभावी अंमलबजावणी करिता १३जानेवारी ते २७ जानेवारी या कालावधीत ''जंत निर्मुलन पंधरवडा साजरा करण्याचा कार्यक्रम सुरु आहे.

यामुळे पशुधनाचे जंतनिर्मुलन झाल्यास पशुधनामधील प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होणार असून जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी आपल्या गोवर्गीय व म्हैसवर्गीय पशूंना दिनांक १३ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत जंत निर्मुलन औषधी जवळच्याच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून पाजून घ्यावेत व तद्नंतर पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून सूचना प्राप्त होताच आपल्या पशूंना लाळखुरकुत लसीकरण करून घ्यावेत, असे आवाहन पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी केले आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी उपलब्ध

बीड । प्रतिनिधी

जिल्हा माहिती कार्यालय, बीड येथील वर्तमान पत्रांची रद्दी आहे त्या स्थितीत व स्वरूपात रद्दीची विक्री करावयाची आहे. ज्यांना रद्दी घ्यावयाची आहे. त्यांना कार्यालयीन वेळेत रद्दी पाहवयास मिळेल. तसेच रद्दी खरेदी करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी त्यांच्या लिफाफाबंद निविदा दरपत्रक प्रति किलोप्रमाणे मा. जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालयाच्या बाजुला, नगर रोड, बीड या पत्यावर दि. २८ जानेवारी २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

रद्दी प्रत्यक्ष पाहून बंद लिफाफ्यात आपले आवश्यकतेनुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. रद्दी विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, रद्दी विक्रीबाबतचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड यांचे असतील.२८ जानेवारी २०२५ तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

# खा.डॉ.कल्याण काळे यांनी घेतली आयसीटी कॉलेजची आढावा बैठक

## प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना

जालना । प्रतिनिधी

जालना शहरात सुरु असलेल्या आयसीटी कॉलेज प्रशासनाची खा. डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार दि. २२ जानेवारी२०२५ रोजी सकाळी ११ वाजता बैठक घेत कॉलेच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी कॉलेजच्या विविध लॅबची पाहणी करुन कॉलेजचे कामकाज समजावून घेतले. दरम्यान जालना शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी उपाय योजना कराव्यात आणि मोसंबी प्रक्रिया करुन ज्युस जास्त काळ टिकविण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठीचे प्रोजेक्ट सादर करावेत अशा सूचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी कॉलेज व्यवस्थापनाला दिल्यात. यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल, आयसीटीचे डायरेक्टर शशांक म्हस्के, डेप्युटी डायरेक्टर डॉ. पराग नेमाडे, डॉ. मनोज गावडे, प्रा. गिरीश जोशी, प्रा. राहुल व्यस,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, नंदु जांगडे, माजी जि. प. सभापती जयप्रकाश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.



जालना शहरात सन २०१८ मध्ये मंजुर असलेल्या आयसीटी कॉलेजमध्ये सध्या ४५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भुवनेश्वर आणि जालना येथे एकाच वेळी आयसीटी कॉलेजला मंजुरी मिळाली होती. जालना शहरात हे कॉलेज सुरु असल्याने जालन्यासाठी आणि जालना जिल्ह्यातील जनतेसाठी कॉलेजने काही तरी चांगले काम केले पाहिजे. जालना शहरातील प्रदूषणासाठी उद्योजकांना दोष देऊन उपयोग नाही, तर प्रदुषण नियंत्रणासाठी आयसीटीने काहीतरी उपाय केला पाहिजे. त्यासाठी लागणारा निधी कमी पडू दिला जाणार नाही. असेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. बैठकी दरम्यान कॉलेजची चांगली प्रगती असून या कॉलेजचे २० विद्यार्थी हे विदेशातही फेलोशिक घेऊन उच्च शिक्षण घेत आहेत. सदरील कॉलेज हे भाड्याच्या इमारतीत सुरु आहे. परंतु, लवकरच त्यांच्या स्वतःच्या इमारतीत हे कॉलेज जाणार असून त्यासाठी शासनाने २०० एक्कर जागा उपलब्ध करुन दिली असून निधी देखील उपलब्ध करुन दिलाय. त्यामुळे इमारत लवकरच उभा करण्याचा माणस असल्याची माहिती खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिली. येणार्या काळात आयसीटी कॉलेजचा जालन्यासाठी काय उपयोग करून घेता येईल? त्यासाठी त्यांची काय मदत होते, आमची त्यांना काय मदत होते, यावर चर्चा केली असून जालन्यासाठी काहीतरी करण्यासाठी जो काही स्कोप आहे. त्यासाठी यापुढे नक्की काम करु असेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे यांनी कॉलेजच्या विविध विभागात जावून पाहणी केली व कॉलेजचे कामकाज समजावून घेतले.

या मुद्यावर झाली चर्चा....

जालना शहरातील प्रदुषण कमी करणार, त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणार - खा. डॉ. कल्याण काळे

जालना शहरात प्रदुषणाचे प्रमाण जास्त आहे, ते कमी करण्यासाठी आयसीटी ने एक प्रोजेक्ट तयार करावा व त्यासाठी जो काही निधी लागेल तो उपलब्ध करण्याची हमी खासदार डॉ. काळे यांनी दिली आहे. हा खर्च उभा करुन जालना शहरातील प्रदुषण कमी करण्यात येईल. जमशेदपूर येथे ज्या पध्दतीने प्रदुषणावर नियंत्रण आहे, अगदी तसेच नियंत्रण जालना शहरातील प्रदुषणावर मिळविण्यात येईल अशीही चर्चा या बैठकीत करण्यात आली. या प्रोजेक्टसाठी जो काही खर्च येईत तो उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटले.

मोसंबी प्रक्रीया आणि पिकाच्या टाकावू कचर्यापासून नवीन तयार करा

दरम्यान आयसीटी कॉलेजच्या व्यवस्थापनासोबत चर्चा करीत असतांना मोसंबीचे ज्यूस हे जास्त काळ टीकवता येत नाही. त्यामुळे त्याला चांगला भाव मिळत नाही. ज्यूस जास्त काळ टीकलं पाहिजे, मोसंबीवर प्रोसेसींग करुन काही तरी उपया योजना केल्या पाहिजेत.

पान १ वरून...

**जिल्ह्यातील गुन्हेगारी ...**

असल्याचे सिद्ध झाल्यास यासंदर्भात संबधितावर कारवाई प्रस्तावित केली जाईल.जिल्ह्यातील सर्व नागरिकांसाठी लक्षात राहील, असा सोपा मोबाईल नंबर जाहीर केला जाणार आहे. याद्वारे तक्रारी घेऊन निराकरण केले जाणार आहे.जातीयतेढ निर्माण होईल, अशा पोस्ट कोणीही करू नयेत. सायबर'चे अधिकारी आणि पोलीस कर्मचारी फेसबुक, व्हॉट्सअँप. आदी सोशल मीडियावर लक्ष देवून आहेत.

शांतता, सुव्यवस्था आणि सलोखा राहण्यासाठी नागरिकांनी आणि पत्रकारांनी सहकार्य करावे, असे आवाहनही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले आहे.

**सोन्याचे दागिने ..**

यांचे हार्डवेअर च्या दुकानाच्या बाजुने जात असताना समोर एक व्यक्ती ऊभा होता.त्याच वेळी अचानक पाठीमागुन मोटार सायकलवरून एक व्यक्ती आला.त्याने डोक्याला हेल्मेट घातले होते.त्याने रामकुंवर उर्फ अनिता हिच्या जवळगाडी ऊभी करून म्हणाला की, शितल शिंदे यांचे घर कोठे आहे ? त्यांची पेपर मध्ये बातमी आलेली आहे.मी पोलीस आहे.असे म्हणुन खाकी ड्रेस असलेले ओळखपत्र दाखवले.त्या नंतर तो म्हणाला की, तुम्ही तुमच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागीने काढुन बॅगमध्ये ठेवा.बायकांनी असे दागिने घालुन फिरायचे नसते.आमचे साहेब भेट दयायला येत आहेत असे म्हणाल्याने त्या महिलेने कानातील झुंबर काढून पर्स मध्ये ठेवले.त्यानंतर त्याने गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण काढण्यास सांगितले.ते लवकर न निघल्याने त्याने गळ्यातील मिनीगंठण काढुन पर्समध्ये काढून टाकल्या सारखे केले. नंतर रामकुंवर उर्फ अनिता यांनी पर्स चेक केली असता त्यामध्ये बनावट गंठण दिसले. त्यामुळे रामकुंवर उर्फ अनिता यांनी त्याची मोटार सायकल धरण्याचा प्रयत्न केला.मात्र दोघे अनोळखी ईसम त्यांची मोटार सायकल क्रमांक २८२९ यावर बसुन केज च्या दिशेने निघुन गेले.

रामकुंवर उर्फ अनिता राऊत यांच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात दोन अज्ञात ठकसेना विरुद्ध गु.र.नं. ३३/२०२५ भा.न्या.सं. २०४,३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल श्रीकांत चौधरी हे पुढील तपास करीत आहेत.

**भारतपर्व महोत्सवात...**

आधारावर महाराष्ट्र राज्याने 'मधाचे गाव' असा चित्ररथ तयार केला. मध माशांचे पर्यावरणाच्या आणि मानवी जीवनाच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. मधाचे व्यावसायिक महत्त्व लक्षात घेऊन, स्थानिक रोजगार निर्मिती आणि उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये 'मधाचे गाव' ही योजना सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश स्थानिक रोजगार निर्मिती करणे आणि गावे आर्थिक

पान १ वरून...

दृष्ट्या सक्षम करणे हा आहे. त्याचबरोबर पर्यटन व पर्यावरण यासाठीही ही योजना महत्त्वाची आहे.

असा असेल 'मधाचे गाव' चित्ररथ...

चित्ररथाच्या पुढच्या भागात फुलांनी सजवेलेली मधमाशीचे आकर्षक शिल्प बसवले आहे. या मधमाशीभोवती लहान मधमाशा आणि काही फुले दाखवली आहेत. भव्य मधमाशीच्या पंखांची हालचाल दाखवण्यात आली असून लहान मधमाशा हवेत उडताना दिसतील.

चित्ररथाच्या मागील भागात एक विशाल मधमाशाचे पोळ चित्रित करण्यात आले आहेत. नैसर्गिकरित्या असणा-या मधुमाशींच्या पोळची अचूक प्रतिकृती बनविली आहे. मधमाश्या त्यांच्याभोवती फिरताना दिसतात. मध उत्पादनाचे टप्पे मोठ्या मधाच्या पोळ जवळ दाखवले आहेत. मध व्यवसायातील महत्त्वपूर्ण उप-उत्पादने देखील दर्शविली आहेत. फुलांच्या परागीकरणातून रस शोषुण घेणा-या मधमाशी प्रतिकृती दर्शविण्यात आली आहे. मध निर्मितीच्या विविध टप्प्यातील प्रक्रिया दर्शविण्यात आले आहेत. मधमाशीपालनात वापरल्या जाणाऱ्या खोक्यांवर मधाचे गाव योजनेत समाविष्ट असलेल्या काही गावांची नावे लिहिली आहेत.

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनातून सदरील चित्ररथ तयार झाल्याची माहिती सांस्कृतिक विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली आहे.

**आ.संदीप क्षीरसागरांनी...**

ना.अजितदादांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच बीड येथील एमआयडीसीच्या विकासाबाबत विविध आग्रही मागण्या आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजिदादा यांच्याकडे केल्या आहेत.

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली. बीड शहर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. याठिकाणी जिल्हाभरातून बेरोजगार, रोजगारासाठी येत असतात. बीडमध्ये भविष्यातही रोजगारासाठी स्थलांतरण होणारी संख्या निश्चित वाढणार आहे. सद्यस्थितीला बीड येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपविभाग अंतर्गत एमआयडीसी मध्यम स्वरूपात चालू आहे. परंतु सध्याच्या आणि भविष्याचा विचार करता येथील एमाआयडीसीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. दरम्यान यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपविभाग बीड आणि बीड महसूल विभागाकडे गायरान जमीन उपलब्ध आहे. अहमदनगर-बीड रेल्वे मार्ग देखील सुरू होत आहे. तसेच बिंदुसरा धरणातून १२ एमएलटी पाणी बीड शहराला ग्रॅव्हिटीद्वारे बीड

पान १ वरून...

शहरात येते. यासोबतच बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी माजलगाव धरणातून बॅकवॉटरद्वारे ४९ एमएलटीची योजना पूर्ण झालेली आहे. त्यामुळे पाणघसाठा देखील मुबलक उपलब्ध आहे. त्यामुळे बीडची एमआयडीसी पंचतारांकित स्वरूपाची होण्याकरिता संबंधित विभागाला आदेशित करून कृती आराखड्यासह प्रस्ताव करण्यासाठी निर्देश द्यावेत अशी आग्रही मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादा पवार यांच्याकडे केली. यावर ना.अजितदादा पवार यांनीही सकारात्मकता दाखवली असून लवकरच बीडच्या एमआयडीसीचा आशावाद आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

**चंपावती महोत्सव...**

बालकलाकारांच्या अर्थातच शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव देण्याकरीता त्यांना स्पर्धात्मक रंगमंच मिळावा या उदात्त हेतूने गतवर्षी याहिवर्षी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक मोठ्या थाटामाटात संपन्न होणार असून बीड जिल्ह्यातील मराठी/इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे असे कळकळीचे अहवान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्नील भैय्या गलधर यांनी केले आहे. गतवर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला अशा विविध कलेच्या स्पर्धांना एकत्रित करून बीड शहरात जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवासाठी बीड जिल्ह्यातील आकरा तालुक्यातील शेकडो शाळांमधील तब्बल ८४४४ बालकलाकार सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा चंपावती महोत्सव पुन्हा एकदा व्हावा अशी इच्छा जिल्हाभरातून बालक पालक तथा शाळा शिक्षकांनी व्यक्त करत होते. यामुळे पुन्हा एकदा यावर्षी भव्य दिव्य चंपावती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना महोत्सवाचे निमंत्रण!

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये दि ०१फेब्रुवारी २०२५ ते दि. ९ फेब्रुवारी २०२५ यादरम्यान संपन्न होणार असलेल्या जिल्हास्तरीय 'चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक' स्पर्धेचे निमंत्रण उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्याबरोबरच सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट साहेब, जलसंधारण मंत्री संजयजी राठोड साहेब यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्निल भैय्या गलधर यांनी भेटून निमंत्रण दिले व बालकलाकारांना प्रोत्साहन देण्याकरिता उपस्थित राहावे अशी विनंती केली.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना गुंतवणूकदार जागरूकतेचे धडे

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थी सुशिक्षीत होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही. आर्थिक साक्षरता होणे काळाची अत्यंत गरज आहे. आपला पैसा कोठे आणि कसा गुंतवायचा, पैसे कसे कमवायचे. आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर तो विद्यार्थी भविष्यात केव्हाच आर्थिक अडचणीत येवू नये यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) कडून एक दिवशीय गुंतवणूकदार जागरूकता कार्यशाळा घेण्यात आली यावेळी सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे धडे दिले.



अलीकडे तरुण वर्गामध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव दिसून येतो. तरुणांचा काळ दिवसेंदिवस चैनी वस्तू, मौजमजा, बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे वळत चालला आहेत. तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक होते. यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे विद्यार्थी दशेमध्ये योग्य ते आर्थिक नियोजन केले तर भविष्यातील येणारे आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात. यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला. आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले. तसेच कॅपिटल मार्केट काय असते?, म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे, एक्सचेंज ट्रेडेड फंड ईटीएफ, गव्हर्नमेंट बॉण्ड इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना सेबीची वेबसाईट व सेबी च्या सारथीचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना खबरदारी च्या सूचना दिल्या. आदित्य पॉलिटेक्निक बीड चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. आदित्य पॉलिटेक्निक कॉलेजचे विभागप्रमुख श्रीकांत शहाणे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. आभार तांबे यांनी मानले.

**विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा - संचालक डॉ. आदित्य सारडा**

आदित्य शिक्षण संस्थेत आलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देताना आम्ही कोठेच कमी पडत नाहीत. पुस्तकी ज्ञान मिळवून आमचे विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात मोठं नाव कमावत आहेत. मात्र येथून बाहेर पडल्यानंतर ते आर्थिक साक्षर होऊन बाहेर पडतावेत. जिवन जगतांना त्यांना आर्थिक नियोजन करता यावे यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे देणारा उपक्रम राबवला.

## अभिमानास्पद,बीडच्या शौर्य शैलेश जाधव यांची महाराष्ट्राच्या १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघात निवड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दोन खेळाडूंची १४ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली ही बातमी अतिशय अभिमानास्पद आहे. आपल्या जिल्हयाचा खेळाडू शौर्य शैलेश जाधव हा वयाच्या सहाव्या वर्षापासून क्रिकेटचा सराव करतो आहे. आणि त्याची मेहनत व प्रशिक्षक शेख अजहर, संजय धस, सागर सांगळे यांच्या मार्गदर्शना मुळे तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य तथा बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सेक्रेटरी आमेर सलीम याचा जिल्ह्यातील सर्व खेळाडूंना आसलेला खंबीर पाठिंबा यामुळे शौर्यने महाराष्ट्र संघात आपले स्थान निर्माण केले आहे.

त्यांने प्रथम बीड जिल्हा कडून खेळताना ९ सामन्यात सर्वाधिक ७६१ धावा करत महाराष्ट्रातील पहिल्या पाच मुलांत आपली जागा निर्माण केली त्यांनतर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील सर्वाधक धावा करणारे व गोलंदाजीत गडीबाद करणारे जवळपास ८० मुले निवडून त्यांचे सामने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सलेक्टर व कोच यांच्या समोर पाच सामने खेळवण्यात आले यात देखील शौर्य जाधव याने चार आर्धशतके करत २९७ रन्स करत सर्व मुलांत आपले दुसरे स्थान कायम राखले व पुढील निवडक चोवीस मुलांच्या कॅम्प मध्ये खेळण्यास पात्र ठरला. यानंतर आपल्या कौशल्यावर त्यांने यामुलांत देखील चांगली कामगिरी केल्या कारणांने महाराष्ट्राच्या संघात शौर्य जाधवची निवड झाली आहे. या निवडीनंतर बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव आमेर सलीम, राजन साळवी, इरफान कुरेशी, जावेद पाशा,रिजवान भाई, गोपाल गुरखुदे, नासेर मोमीन,शाहरूख पठाण, अतिक कुरेशी, निसार तांबोळी, सुनिल वाघमारे,रोहित जाधव,मोहीत परमार,चंद्रकांत हुरकूडे,संतोष कवटेकर, प्रकाश गालफाडे, सुदामजी शेळके, बाबासाहेब गोरे, विजय पिव्हाळ,संजय कुलकर्णी, सखाराम घोडके,राजेश घनघाव,यांच्यासह बीड जिल्हा वकील क्रिकेट संघाने शौर्यला शुभेच्छा देत महाराष्ट्र संघाकडून चांगले खेळण्यासाठी अशिर्वाद दिले.शौर्य जाधवला ज्येष्ठ प्रशिक्षक अजहर शेख, संजय धस, सागर सांगळे, फिटनेस कोच नासेर मोमीन,राहूल जाधव, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.



## मातृभाषेतील शिक्षणामूळे प्रगतीची महाद्वारे खुली होतात - प्रा. डॉ. मकरंद गिरी

लातूर । प्रतिनिधी

मातृभाषा ही हृदयाची भाषा असते, मातृभाषेतील शिक्षणामुळे प्रगतीचे महाद्वारे खुली होतात, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते तथा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक प्रा. डॉ. मकरंद गिरी यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील खट-उ, राष्ट्रीय सेवा योजना, मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत विस्तार व्याख्यान व उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर खट-उ समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, हिंदी विभागप्रमुख डॉ. मनोहर चपळे आणि मराठी विभागप्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन झाले, यावेळी शिवाली मुकडे हिने स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना डॉ. मकरंद गिरी गिरी म्हणाले की, वैयक्तिक गुणवत्ता व सामाजिक कार्यक्षमता याच्या विकसनात मातृभाषेचा भरीव वाटा असतो. मातृभाषा व्यक्तीच्या जाणीवेची असल्या कारणाने



व्यक्तिमत्त्व विकासात ती जीवनरस पुरवते. त्यामुळे प्राथमिक शिक्षण हे सक्तीने मातृभाषेतूनच दिले पाहिजे. मराठी ही महाराष्ट्राच्या अभिमानाचा केंद्रबिंदू असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करून देण्यात संतांनी केलेले साहित्यिक कार्य बहुमोल असे आहे. आज मराठी भाषा ज्ञानभाषा होत असून ज्ञान विज्ञान, माहिती तंत्रज्ञान यातही या भाषेचा वापर होत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे भाषेच्या नावलौकिकात भर पडलेला असून साहित्य व्यवहार, सेवा संधी, व्यापार, उद्योग, रोजगाराच्या संधी, अनुवाद क्षेत्र, स्पर्धा परीक्षा यात मराठी भाषेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत जाईल. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा राजमार्ग खुला झाला असून भाषेची बंधने आता गळून पडली आहेत, असेही ते म्हणाले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात दिशादर्शक अशा उत्तम मार्गदर्शकाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी आभासी समाजमाध्यमांच्या मागे न लागता अभिजात दर्जाच्या साहित्याच्या वाचनातून आपली बौद्धिक क्षमता विकसित करावी. यशासाठी जिद्द, चिकाटी परिश्रम, सातत्य आत्मविश्वास यांची नितांत गरज असते. उत्तमांच्या सान्निध्यात राहून आपला सर्वांगीण विकास विद्यार्थ्यांनी घडवून घ्यावा असेही ते म्हणाले. याच कार्यक्रमात महाविद्यालयीन निवडणूक विजेते अध्यक्ष शिवाली मुकडे, अजय राऊत, प्राणिता स्वामी, उपाध्यक्ष ऋतूजा भिसे, मंथन स्वामी आणि मानसी बनशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. सागर ठाकूर यांनी केले तर आभार प्रा. मारुती माळी यांनी मानले.या कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता प्रा. शंकर भोसले, व्यंकट दुडिले, प्रा. डॉ. किरण शिंदे, सय्यद जलील, बालाजी डावखरे, नंदू काजापुरे यांनी परिश्रम घेतले.

## बीडमधील पात्र इच्छुकांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी ऑनलाईन नोंदणी करावी - सलीम जहाँगीर

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) २.० अंतर्गत सध्या पात्र इच्छुकांकडून ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने इच्छुकांनी तात्काळ ऑनलाईन नोंदणी करून या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन भाजप नेते सलीम जहाँगीर यांनी केले आहे. भाजप नेते सलीम जहाँगीर यांनी पत्रकात म्हटले आहे, प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० या योजनेला सुरुवात झाली आहे. त्या अंतर्गत पात्र इच्छुकांनी घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. नवीन घरकुल मंजुरी करीता वेब पोर्टल वर इच्छुक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी. नोंदणीसाठी भारतामध्ये अर्जदाराचे तसेच कुटूंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे. अर्जदाराने मागील २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदार हा आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील असावा. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ४.५० लक्ष रुपये कमाल राहील.योजनेअंतर्गत बांधण्यात येणारी घरे कुटूंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील. घराचे बांधकाम करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा असावी. लाभार्थी कुटूंबामध्ये पती-पत्नी व अविवाहित मुले/मुली (वय वर्षे १८ खालील मुले/मुली) यांचा समावेश असावा.स्वतःच्या नावाने



आधारलिंक असलेले बँक खाते असावे. जात प्रमाणपत्र (डउ,डढ,जइउ लाभार्थ्यांसाठी आवश्यक आहे) हे अर्जदारांसाठी पात्रतेचे निकष आहेत. त्याचबरोबर नवीन घरकुल ऑनलाईन नोंदणी करण्याकरीता अर्जदाराचे आधार कार्ड (मोबाईल नंबर लिंक असलेले) अर्जदार यांचे कुटूंबामधील सर्व सदस्यांचे आधार कार्ड (पती/पत्नी व मुले) उत्पन्नाचे चालु वर्षाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे) जात प्रमाणपत्र राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक (आधार लिंक असलेले) जागेचे पुरावे (पी.टी.आर, पी. आर. कार्ड, ७/१२ किंवा खरेदीखत) अर्जदार यांचे आई व वडिलांचे आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र) पी. एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी. एम. विश्वकर्मा इत्यादी योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत हे कागदपत्र आवश्यक आहेत. संपुर्ण कागदपत्राच्या मुळ प्रतीसह ऑनलाईन नोंदणी करुन प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० योजनेमध्ये

# श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही , मुख्यमंत्री फडणवीस

मानूर/शाहेबाज पठाण

श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर विविध विकास कामे चालू असुन या पुर्वी दोन वेळा आपण आलो होतो तेव्हा २५ कोटीची विकास कामे मंजूर करून आज गडावर वीवीध विकास कामे होत आहेत तेव्हा येत्या काळात गडाच्या विकासासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नसल्याचे प्रतीपादन मोबाईल ऑडिओ क्लिप द्वारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडवणीस यांनी केले.

तर मला यायला उशीर होणार होता माझे हेलिकॉप्टरचा पायलट नसल्याने मी येऊ शकले नाही तेव्हा सर्वांची दिलगिरी व्यक्त करते पण मी निश्चित गडावर येऊन दर्शन करणार असल्याचे व मी उतणार नाही मातणार नाही तुम्हाला माझं नाव घेतल्यावर मान खाली घालायची वेळ येऊ देणार नाही असे मी कदापिही वागणार नसल्याचे महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री मा ना पंकजाताई मुंडे यांनी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावरील श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त सोहळ्यात उपस्थित राहता आले नसल्याने मोबाईल व्हाईस क्लिप द्वारेसर्व समाज बांधवांना बोलताना व्यक्त केले.

श्रीक्षेत्र वामनभाऊ महाराज यांची बुधवार दिनांक २२ रोजी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर ४९ वी पुण्यतिथी सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. व्यासपीठावर संस्थांचे मठाधिपती श्री विठ्ठल महाराज बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री जयदत्त क्षीरसागर, मा आ भीमराव धोंडे, मा आ बाळासाहेब मुरकुटे, पै सतीश आबा शिंदे आधी विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्या प्रसंगी महंत विठ्ठल महाराज यांनी येणाऱ्या वर्षांमध्ये श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पन्नासाव्या पुण्यतिथी निमित्त सात दिवस स्वताचे आयोजन करण्यात आले असून शिस्त भाऊंना प्रिय होते तेव्हाही पुण्यतिथी मध्ये जत्रा नव्हे ती यात्रा आहे वारकरी संप्रदायाचे हे मूळ अधिष्ठान असो तर क्षेत्र गहिनीनाथ गडावर ही परंपरा ज्ञानोबारायापासून आज पर्यंत चालत आलेली आहे गेल्या सात महिन्यापूर्वी माझा गंभीर अपघात झाला होता परंतु सद्गुरु भाऊंच्या आशीर्वादाने मला पुन्हा ५० वी पुण्यतिथीनिमित्त माझ्या हातून व्हावी म्हणून सद्गुरु भाऊंच्या आशीर्वादाने या कार्यक्रमास उपस्थित राहता आले असल्याचे मत संस्थांचे मठाधिपती गुरुवर्य ह भ प विठ्ठल महाराज यांनी व्यक्त केले.

येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस नाहीत आले ते दावोस मध्ये दररोज हजारो कोटींचे उद्योग

## निश्चितच गडावर दर्शनासाठी येणार. मा ना पंकजाताई मुंडे



महाराष्ट्रात आणण्यासाठी गेले आहेत तेव्हा त्यांनी एखादा उद्योग बीड जिल्ह्याला द्यावा असे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी म्हटले आहे

दरवर्षी मी इथे न चुकता गहीनाथ गडावर येतो सद्गुरु वामन भाऊ यांचा आशीर्वाद घेऊन व विठ्ठल महाराजांच्या आशीर्वाद घेऊन यापुढेही मी सातत्याने सद्गुरु बाबांचे आशीर्वाद घेणार आहे असल्याचे प्रतिपादन माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी म्हटले

वैराग्यमूर्ती संत वामनभाऊ महाराज यांची ४९ वी पुण्यतिथी असून मी भाऊंच्या स्मृतीला आदरांजली वाहतो सातत्याने वाढत्या जनतेचा लोंढे पाहता क्षेत्र गहिनीनाथ गडावर मुख्यमंत्र्याच्या विकास निधीतून अनेक कामे चालू आहेत आम्ही देखील आमच्या काळामध्ये अनेक कामे केली महाराजांनी जो आदेश देतील तो पूर्ण करू असे मत माजी पालकमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी म्हटले

श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर सध्या २५ कोटीची कामे चालू असून या ठिकाणी येण्यासाठी आमंत्रणाची गरज नाही सिध्द पुरुष म्हणून संत वामनभाऊ महाराज यांचा वसा या ठिकाणी आजही आहे शिक्षण समता बंधुता यांची शिकवण देणारे संत वामनभाऊ महाराज होऊन गेले हा गड सर्व जाती धर्माचा गड आहे आता २५ कोटीची विकास कामे चालू आहेत आणि यापुढे कुठलाही कामासाठी सरकारतर्फे पैसे कमी पडू दिला जाणार नाही

श्री क्षेत्र गहिनीनाथ गड ते श्रीक्षेत्र पंढरपूर हा पालखी मार्ग लवकरच पूर्ण करणार सध्या गडावर ३०० ते ४०० चा भव्य दिव्य मंडप लवकरच पूर्ण होत असल्याने सध्या उभारणीचे काम चालू आहे भक्तनिवास प्रवेशद्वार इत्यादी कामे दर्जेदार होणार असल्याचे यावेळी बोलताना म्हटले आहे

पुण्यतिथीचे वैशिष्ट्ये - सकाळी सहा ते नऊ महाराष्ट्र राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या व महंत विठ्ठल महाराज यांच्या हस्ते नवनाथाचा परंपरे नुसार व श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या समाधीचा महा अभिषेक होऊन सकाळी दहा वाजता ह भ प आसाराम महाराज बडे श्रीक्षेत्र आळंदी देवाची यांचे सुश्राव्य कीर्तन झाले आणि बरोबर अकरा वाजून ४५ मिनिटांनी पुण्यतिथीचे औचित्य साधून पुष्पवृष्टी करण्यात आली याप्रसंगी घा पारगाव येथील डॉ तुकाराम नेहरकर यांनी हेलिकॉप्टर द्वारे समाधीवर पुष्पवृष्टी करून आपली सेवा प्रगट केली

दिनांक २२ जानेवारी १९७६ दुपारी बरोबर ११ ४५ वाजता सद्गुरु वामनभाऊ यांनी आपला देह ठेवला होता

## विद्यार्थ्यांनी घेतली कॉपीमुक्त परीक्षेची शपथ

परळी / प्रतिनिधी

परीक्षेला सामोरे जाताना नियमांचे काटेकोरपणे पालन करेल, कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब न करता अभ्यास करून परीक्षेला सामोरे जाईल, बाहेरील साहित्य वापरणार नाही, कुणाचं पाहून लिहिणार नाही, काही गैरप्रकार घडत असतील तर त्वरित शिक्षकांना कळवू, अशी शपथ परळी तालुक्यातील महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय मोहा येथील विद्यार्थ्यांनी घेतली.राज्यात ११ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान बारावी व दहावीच्या परीक्षा पार पडणार आहेत. याच अनुषंगाने परीक्षा पारदर्शकपणे व कॉपीमुक्त पार



पाडण्याकरिता मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत कॉपीमुक्त अभियान जनजागृती सप्ताह राबविण्यात येत आहे.या अभियानातंर्गत शपथविधीचे आयोजन महाराष्ट्र विद्यालय मोहा येथे केले होते.महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा चे सचिव, संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर बोराडे, उपमुख्याध्यापक सुरेंद्र हरदास, पर्यवेक्षक केशव दीक्षित यांच्या उपस्थितीत सर्व शिक्षकांच्या सहकार्याने हा शपथविधी पार पडला.

# पहिल्या दिवशीचे गुंतवणूक करार ६,२५,४५७ कोटींवर

महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी केले निमंत्रित, टाटा समूह ३०,००० कोटी गुंतवणूक करणार

बीड जिल्ह्यात १५,००० मेवॉ पाईपलाईन आणि पवनऊर्जा प्रकल्पाबाबत झाली चर्चा

दावोस - दावोस येथील वर्ल्ड इकोनॉमिक फोरममध्ये पहिल्या दिवशी महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ६,२५,४५७ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले आहेत. एकाच दिवशी इतक्या मोठ्या रकमेचे करार होणे, हा एक नवा विक्रम आहे. दरम्यान आज दुसऱ्या दिवशी सुद्धा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करार होणार आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सामंजस्य

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्या अनेक कंपन्यांच्या भेटी

करारांच्या व्यतिरिक्त अनेक कंपन्यांच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित केले. टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांचीही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. टाटा समूह ३० हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे.

काल्सबर्ग समूहाचे सीईओ जेकब अरुप अँडरसन यांची त्यांनी भेट घेतली. काल्सबर्ग समूहाने महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा प्रदर्शित केली असून, त्यांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

रिटेल क्षेत्रात कार्यरत लुलू समूहाचे प्रबंध संचालक एमए युसुफ अली यांचीही देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. त्यांनी नागपुरात गुंतवणूक करण्याची इच्छा प्रदर्शित केली असून, महाराष्ट्रातही त्यांनी विस्तार करण्याची तयारी दर्शविली आहे.

रिन्यू पॉवरचे अध्यक्ष आणि सीईओ सुमंत सिन्हा यांची देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. बीड जिल्ह्यात १५,००० मेवॉ पाईपलाईन आणि पवनऊर्जा प्रकल्पाबाबत यावेळी चर्चा झाली.

शिंडर इलेक्ट्रीक इंडियाचे प्रबंध संचालक आणि सीईओ दीपक शर्मा यांचीही त्यांनी भेट घेतली. जागतिक बँकेच्या मदतीने राज्यातील आयटीआयच्या सक्षमीकरण कार्यक्रमात तसेच ऊर्जा क्षेत्रात एआयच्या वापराबाबत सहकार्य करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. अहिल्यानगर आणि नाशिक येथे विस्तार करण्याच्या त्यांच्या योजनांचेही सूतोवाच त्यांनी केले.

मास्टरकार्ड, एपीएसीचे अध्यक्ष लाईंग हाई यांचीही त्यांनी भेट घेतली. लुईस ड्रेफसचे सीईओ मायकेल ग्लेंची यांच्याशी शेती, अन्नप्रक्रिया, आंतरराष्ट्रीय शिपिंग आणि वित्तीय क्षेत्राबाबत मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली.

# मंठा तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक

मंठा । प्रतिनिधी

मा,ना, श्री, एकनाथरावजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते यांच्या २५ जानेवारी रोजी जालना दौरा असून या संदर्भात पूर्व नियोजनासाठी शिवसेना प्रमुख पदाधिकाऱ्यांची आज मंठा येथे शिवसेना संपर्क कार्यालय प्रल्हादराव बोराडे कॉम्प्लेक्स येथे बैठक घेण्यात आली यावेळी या बैठकीला संबोधित करताना शिवसेना उपनेते मुंबई आनंदराव जाधव साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब जी घुगे, शिवसेना नेते मोहनजी अग्रवाल, संपर्क नेते विलास जी पारकर साहेब, संपर्क नेते राजेश जी मोरे साहेब, महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदाताई शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख उदय दादा बोराडे, परतुर तालुका प्रमुख अमोल सुरंग, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सुनीता देशमुख, संगीता खराबे, सविता गवळी, तांबे



ताई, मीरा सरकटे, बाबासाहेब चिखले, विलासराव शिंदे, योगेशराव गणगे, शिवाजी तरवटे, विजयकुमार गिरी, दीपक हिवाळे, दिलीपराव हिवाळे, विलासराव राठोड, नितीन मोरे, रामराव वरकड, सतीश देशमुख, बाळासाहेब देशमुख, भीमराव वाघ, पांडुरंग बोराडे, अमोल विरकर, दत्तात्रय बोराडे, दिपक गायकवाड, विजय चव्हाण, राजेश खरात, विनोद प्रधान, माऊली वायाळ ,संतोष देवकर, स्वप्निल गडदे, महेश देशमुख, बाळासाहेब घोरसड ,शुभम गुंड, समाधान शेवाळे, सतीश गुंड, हलीम कुरेशी ,विष्णू मोरे ,अनिल बोराडे, महेश बोराडे ,गोपाल बोराडे, संजय राठोड, विनोद खरात, पवन खरात ,विशाल गोडगे, सतीशराव वायाळ, महेश देशमुख ,उमेश राठोड,

# आजच्या तरुणांनी झोप नाही तर झेप घेतली पाहिजे – डॉ. रामेश्वर पाटील

बदनापूर । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बदनापूर शाखेच्या वतीने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त युवक सप्ताहाचे आयोजन केले होते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अविरतपणे काम करणारी जगातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद दरवर्षी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त त्यांचे विचार युवक सप्ताह साजरा करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असते. या निमित्त बदनापूर शाखेच्या वतीने श्रीमती मैनाबाई माध्यमिक विद्यालय, धोपटेश्वर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून अभाविपचे बदनापूर शहराध्यक्ष प्रा. डॉ. रामेश्वर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले डॉ. रामेश्वर पाटील म्हणाले की, आजच्या तरुणाला झोप नाही तर झेप घेण्याची गरज आहे. कारण आजचा तरुण हा मोबाईलच्या आहारी गेला



आहे. ज्याला स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. तसेच विद्यार्थिनींना देखील आव्हान केले की, तुमच्या आदर्श राजमाता जिजाऊ व अहिल्यादेवी होळकर असायला पाहिजे तेव्हाच आपला देश यशाकडे वाटचाल करील. या व्याख्यानास अखिल भारतीय विद्यार्थी परिषद जालना जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे, बदनापूर शहर सहमंत्री अनिकेत इंगळे, युवक सप्ताह प्रमुख निलेश ओळेकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री. बनकर सर व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# रेल्वे थांबत कशी नाही थांबलीच पाहिजे रेल्वे थांबा कृती समितीची आक्रोश मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड इमामपूर रोड रेल्वे थांबा बैठक प्रसंगी कृती समितीची बीड रेस्ट हाऊस येथे बैठक झाली या बैठकीत सर्व पक्षीय नेते कार्यकर्ते उपस्थित होते, राजकीय पक्ष बाजूला सोडून रेल्वे कृती समिती बनविण्यात आली आहे.या बैठकीत सर्वांच्यामते दैनिक पार्श्वभूमी चे संपादक श्री गंमत भाऊ भंडारी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली व कृती समितीच्या नूतन अध्यक्षासह सर्व कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री नामदार श्री धनंजय मुंडे साहेब यांना बीड इमामपूर रोडवरच रेल्वे थांबा करा असे निवेदन देऊन विनंती करण्यात आली आहे.

यावेळी कृती समितीचे नूतन अध्यक्ष श्री गंमत भाऊ भंडारी प्रकाश आंबेडकरनगर इमामपुर रोड बार्शी नाका कृती समितीचे कार्याध्यक्ष खुर्शीद आलम, ज्येष्ठ नेत्या सौ.सुशीला ताई मोराळे,स्वप्निल भैया गलधर,बी.बी.जाधव, सुनील सुरवसे, लोकपत्रकार भागवत तावरे, सुहास पाटील, हाशम बागवान,राजू



जोगदंड,मनोज जाधव,शेख अखील, विष्णू निसर्गण, संजय गुरव, आदिनाथ भांडवले, बाबा जाधव, प्रा.रफिक बागवान,महेश सिंगन, शेख अजहर, मोमीन सलीम,राजू ढोले, वजीर अत्तार, नारायण ढोकने, दीपक चौगुले, शेख जाकेर, मोमीन रफियोदीन, गहिनीनाथ मस्के,अमोल अहिरे, शेख अय्युब, महेश चांडक, लतिफ पठाण, आदीनाथ भांडवले, सगाळकर सुशांत,व इतर सर्व सदस्य सह कृती समितीचे हजारो सदस्य हजर होते, वरील मागणी न झाल्यास लवकरच पुढील निर्णय घेण्यात येईल असे कृती समितीचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष आणि सदस्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

## विद्यार्थ्यांस अमानवीय मारहाण केल्याप्रकरणी

# शहागडच्या मुख्याध्यापकाच्या चौकशीचे शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश

शहागड/प्रतिनिधी

शहागड येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. खेडकर यांनी सातवीतील विद्यार्थ्यांस अमानवीय पध्दतीने मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. या प्रकरणी संतप्त पालकांनी मुख्याध्यापकांविरुद्ध तक्रार दाखल केली केलेली असून, त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखिळ यांनी काल सोमवारी (दि. २०) अंबड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले असून, चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सात दिवसात अहवाल सादर करण्याचे सुचविले आहे.



सातवीतील विद्यार्थी चुकून नववीच्या वर्गात बसल्याने मुख्याध्यापक खेडकर यांनी त्याला डोक्याच्या केसांनी ओढत हातावर आणि मांडीवर जबर मारहाण केली होती. या प्रकारामुळे विद्यार्थ्याला शारीरिक इजा तर झालीच, पण मानसिक धक्काही बसला. तापाने ग्रस्त झालेल्या विद्यार्थ्याने घरी जाऊन हा प्रकार पालकांना सांगितला. याप्रकरणी मोबीन बागवान यांनी जिल्हाधिकारी, सीईओ आणि शिक्षण अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले होते. त्यांनी मुख्याध्यापक खेडकर यांना सेवेतून तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. फक्त बदली करून हा प्रश्न सुटणार नाही, कारण मुख्याध्यापकांचे वर्तन विद्यार्थ्यांसाठी घातक ठरत आहे, असे त्यात नमूद करण्यात आलेले आहे.

या प्रकरणी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखिळ यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली असून, मुख्याध्यापक खेडकर यांच्या वर्तणुकीची चौकशी करून येत्या सात दिवसात स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्याची सूचना गटशिक्षणाधिकाऱ्यांना केली आहे. जर या प्रकरणी योग्य ती कारवाई झाली नाही, तर पालक तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा मोबीन बागवान यांनी दिला आहे. या प्रकरणाचा चौकशी अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई होणार आहे.

# घरकुल योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा – भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे

बीड । प्रतिनिधी

नरेंद्र भाई मोदी आणि देवेंद्र फडणवीस उर्फ देवाभाऊ फडणवीस यांनी अतिशय चांगल्या प्रकारे गोरगरीब लोकांना घरकुल मिळावे कोणीही वंचित राहू नये हा निर्णय भारतासह महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र सरकारने देखील घेतल्यामुळे सर्व तमाम भारतीयांमधून मोदी सरकारचे फडणवीस सरकारचे कौतुक होत आहे . लंबवर्तुळाकार क्षेत्र निवडण्यासाठी ड्रॅग करा १) अर्जदाराचे आधार कार्ड (मोबाईल नंबर लिंक असलेले), २) अर्जदार यांचे कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड (पती/पत्नी व मुले), ३) उत्पन्नाचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे), ४) जात प्रमाणपत्र ५) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक (आधार लिंक असलेले), ६) जागेचा पुरावे (पी.टी.आर, पी. आर. कार्ड, ७/१२ किंवा खरेदीखत), २) अर्जदार यांचे आई व वडिलांचे आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र), ८) पी. एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी.एम. विश्वकर्मा इ. योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत आवश्यक आहे..प्रधानमंत्री आवास योजना २.० सुरुवात झाली असून, नगरपरिषद बीड हद्दीतील निकषात बसणाऱ्या नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे सभापती नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात बीड शहरातील तसेच बीड जिल्ह्यातील सर्व जनतेला आवाहन केले आहे. गरिबांचे घराचे स्वप्न साकार व्हावे या बाबीसाठी सरकारकडून ही योजना घरकुलाच्या संदर्भात दिल्ली सह आता महाराष्ट्र राज्यात देखील राबविण्यात येत आहे म्हणून भारताचे लोकप्रिय प्रधान सेवक तथा पंतप्रधान मा नरेंद्र जी भाई मोदी साहेब आणि महाराष्ट्राचे कुशल आणि सुसंस्कृत मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ देवा भाऊ यांच्या उत्कृष्ट कार्याचे सर्व दिल्ली सह महाराष्ट्रातील तमाम नागरिकांमधून कौतुक होत आहे कारण की गोरगरीब लोकांना न्याय फक्त भारतीय जनता पार्टीचे सरकारच देऊ शकते असे देखील तमाम नागरिकांमधून सध्या चर्चा होत आहे आणि दिल्ली सह महाराष्ट्रातील सरकार व अतिशय जनता सध्या खुश आहे ते करत असलेल्या कामाच्या बाबतीत सर्व लाडक्या बहिणी मधून व तमाम भारतीयांमधून समाधान व आनंद व्यक्त होत आहे प्रधानमंत्री आवास योजनेचा शहरी २.० टप्पा सुरू आला आहे. यासाठी ऑनलाईन



अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी पात्रतेचे निकष बाप्रमाणे असून, भारतामध्ये अर्जदाराचे तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे, अर्जदाराने मागील २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, अर्जदार हा आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील असावा, अर्जदाराचे चार्षिक उत्पन्न मर्यादा ४ लाख ५० हजार कमाल राहील, बोजनेअंतर्गत बांधण्यात येणारी घरे कुटूंबातील कत्यां महिलेच्या किंवा पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील, पती, पत्नी सह अविवाहित मुलांचा समावेश असावा, आधार लिंक असलेले स्वत: चे बँक खाते असावा, एस.सी. एसी, ओबीसी मांच्यासाठी जातप्रमाणपत्र आवश्यक आहे. या निकषात बसणाऱ्या नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने येथे अर्ज भरावेत असे आवाहन बीड जिल्ह्याचे भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा भाजपा नेते तथा बीड नगर परिषदेचे सभापती नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी या प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात मध्ये सर्व जनतेला आव्हान केले आहे आणि सध्या बीड जिल्ह्यामध्ये नवनाथांना शिरोळे पाटील यांचे कार्य देखील भाजप सदस्य नोंदणीचे अतिशय जोरदार आणि धडाकेबाज बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र गावागावांमध्ये खेड्यापाड्यांमध्ये चालू असल्यामुळे तमाम बीड जिल्ह्यातील नागरिकांना शासनाकडून आणि सरकारकडून लाभ अधिकाधिक चांगल्या प्रकारे कसा मिळवून देता येईल याच्यासाठी देखील नवनाथांना शिरोळे पाटील हे सदैव सक्रिय असल्यामुळे त्यांच्या कार्याच्या बाबतीत देखील बीड जिल्ह्यातील तमाम नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# बीडची ग्रुप कॅप्टन दामिनी देशमुख करणार प्रजासत्ताक दिनी वायुदलाच्या पथसंचलनाचे नेतृत्व

अंबाजोगाई (वसुदेव शिंदे)

बीड जिल्ह्याला अभिमान वाटावा अशी वडवणी तालुक्यातील देवडी या गावची दामिनी दिलीप देशमुख ही २६ जानेवारीला कर्तव्यपथावर होणाऱ्या भारतीय सेनेच्या विविध सैन्याचे पथसंचालन करण्यात येते. यावर्षी वायुदलाच्या तुकडीच्या पतसंचलनाचे नेतृत्व दामिनी दिलीप देशमुख करणार आहे. मराठवाड्यातील पहिली मुलगी दामिनी ही वायुसेनेत देशसेवेसाठी दाखल झाली. मुली ही काही कमी नाहीत. लहानपणापासूनच तिचे ध्येय सैन्यात अधिकारी म्हणून भरती होण्याचे होते. त्यासाठी तिने कठोर परिश्रम घेतले.

सैनिक शाळेमध्ये असताना सर्व प्रशिक्षण घेतले. तिचे वडील माजी न्यायमूर्ती दिलीपराव देशमुख व आई यांनी तिला पाहिजे ते सर्व करण्यासाठी सहकार्य केले. आजच्या मुली वेगळी वाट व तितकीच अवघड वाट तिने निवडली आहे. तिला नेहमीच प्रोत्साहन देत असतात. तिने एस एस बी निवड परीक्षा देऊन अत्यंत खडतर कठोर परिश्रम घेतले व भारतीय वायुदलात सहभागी झाली. याही ठिकाणी दैदीप्यमान यश तिने प्राप्त केले व या वर्षी २६ जानेवारीला कर्तव्यपथावर होणाऱ्या



पथसंचालनासाठी टीमचे नेतृत्व करण्यासाठी तिची निवड झाली. ही नुसत्या बीड जिल्ह्यासाठी नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

अत्यंत कठीण परिश्रम या परेडसाठी घ्यावे लागतात. पण तेवढाच रोमार्षक क्षण व आनंदाचा क्षण आहे. व बीड जिल्ह्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. मराठवाड्यातील ही पहिली मुलगी आहे तिने वायुसेनेच्या माध्यमातून प्रजासत्ताक दिनी परेडचे नेतृत्व करत आहे. तिच्या या यशाबद्दल माझी न्यायमूर्ती दिलीपराव देशमुख ,महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार एस एम देशमुख, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉक्टर सुरेश खु, पत्रकार रामभाऊ कुलकर्णी, कल्याण कुलकर्णी ,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, रक्षामंत्री पदक मेजर एस पी कुलकर्णी, जय हिंद ग्रुपचे सुभाष शिंदे ,भागवत मसने, प्राचार्य रमण देशपांडे ,डॉक्टर प्रवीण भोसले, संतोष चौधरी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

बीड जिल्ह्याला अभिमान वाटावा अशी वडवणी तालुक्यातील देवडी या गावची दामिनी दिलीप देशमुख ही २६ जानेवारीला कर्तव्यपथावर होणाऱ्या भारतीय सेनेच्या विविध सैन्याचे पथसंचालन करण्यात येते. यावर्षी वायुदलाच्या तुकडीच्या पतसंचलनाचे नेतृत्व दामिनी दिलीप देशमुख करणार आहे. मराठवाड्यातील पहिली मुलगी दामिनी ही वायुसेनेत देशसेवेसाठी दाखल झाली. मुली ही काही कमी नाहीत. लहानपणापासूनच तिचे ध्येय सैन्यात अधिकारी म्हणून भरती होण्याचे होते. त्यासाठी तिने कठोर परिश्रम घेतले.

# पत्रकारांनी दोष दाखवताना, नकारात्मक परिणाम होणार नाहीत याची काळजी घ्यावी – जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

पत्रकारीता हा समाजाला दिशा देणारा महत्वाचा घटक आहे. अलीकडच्या काळात माध्यमांची व्याप्ती वाढलेली असली तरी मुद्रीत प्रसार माध्यमांचे महत्व कायम आहे. या क्षेत्रात लिखान करणार्या व्यक्तींनी मराठी भाषेचा महिमा वाढवण्याचे काम करावे.तर समाजातील दोष दाखवताना, त्यामधून नकारात्मक परिणाम होणार नाहीत याचीही काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले.

बीड येथे२० जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शाखेच्या वतीने दर्पण दिनानिमित्त जिल्ह्यातील ११ पत्रकारांना तसेच एका वृत्तपत्र विक्रेत्यांना यावर्षीचा दर्पण पुरस्कार देण्यात आला.यामध्ये बीड -गंगाधर काळकुटे (सूर्योदय ), परळी -संजय खाकरे (लोकमत),माजलगाव- उमेश मोगरेकर (झुंजार नेता ),वडवणी - जानकीराम उजगरे ( दिव्य मराठी ),धारूर -सय्यद शाकेर (प्रजापत्र ),अंबाजोगाई -अ.र.पटेल (मराठवाडा दर्पण ),आष्टी -अनिरुद्ध धर्माधिकारी (सकाळ ),पाटोदा -संजय सानप (लोकाशा ),शिरूर -अशोक भांडेकर (पार्श्वभूमी ),गेवराई -काझी अमान (लोकप्रभा ),केज -अमोल जाधव (कार्यारंभ ),वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार - अर्जुन बेद्रे यांना जिल्हाधिकार्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला माजी मंत्री बदामराव पंडित, बीड जिल्हा पत्रकार संघाचे संस्थापक संतोष मानूरकर हे उपस्थित होते.या प्रसंगी बोलतांना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पत्रकारीता आणि मराठी भाषा याचे परस्परांशी असलेले नाते उलगडून दाखवले. प्र.के.अत्रेंपासून ते बाळासाहेब ठाकरेंपर्यंत अनेक संपादकांच्या अग्रलेखांनी मराठी भाषेला समृध्द केलेले आहे. मुद्रीत माध्यमांपासून पत्रकारीतेला सुरुवात झालेली आहे. जुन्या काळात व्याकरणाच्या चुका होवू नयेत यासाठी गांभिर्यपुर्वक काळजी घेतली जात असायची. त्यातूनच संपादकांच्या डुलक्या, मुद्रीत राक्षसांचा प्रताप असे विनोदी विषय सुध्दा जन्माला आले. अर्थात मराठी वृत्तपत्र त्या काळी तेव्हढ्याच आत्मीयतेने वाचले जात असायचे. पाक्षीक,साप्ताहिक,मासिक स्वरुपातील माध्यमांनी सुध्दा आपले अस्तित्व निर्माण केले होते. आज माध्यमांचे स्वरुप प्रचंड वेगाने बदलत आहे. तरी सुध्दा मुद्रीत माध्यमांचे महत्व कमी झालेले नाही. येणार्या काळात हे महत्व टिकवून ठेवणे एक आव्हान असेल. त्यासाठी या क्षेत्रात पत्रकारीता करणार्या मंडळींनी अधिकाधिक सज्ज आणि सतर्क राहावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.




बीडमध्ये दर्पण पुरस्काराचे वितरण

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

## ३१व्या वर्षी परंपरां राखत श्री साई पायी पालखी सोहळा शिर्डीकडे मार्गस्थ

# अंबानगरीत पालखीचे जल्लोषात स्वागत; साईनामाने अंबानगरी दुमदूमली

अंबाजोगाई प्रतिनिधी

तालुक्यातील अंबासाखर कारखाना येथील श्री साई मंदीरातून पायी पालखी सोहळा सोमवार २२ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हाती भगव्या पतका असलेल्या शेकडो साई भक्तासह ढोलताश्याच्या गजरात, साईनामाच्या जयघोषात फटाक्याची अतिषबाजी करत शेकडो साईभक्तसह श्री साई पायी पालखी सोहळ शिर्डीच्या दिशेने अंबाजोगाई मार्गे चनई धारूर मुक्कामी मार्गस्थ झाला आहे. पालखी सोहळ्यात जिल्यातून शेकडो साईभक्त सहभागी झाले आहेत.

तालुक्यातील अंबासाखर कारखाना येथील साई मंदीरातून शिर्डीकडे जनारा श्री साई पायी पालखी सोहळयास मराठवाडयातील मानाची पहिली पालखी म्हणून ओळखला जातो. पालखी अध्यक्ष गोकुळ महाराज वैष्णव यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी २२ जानेवारी रोजी शिर्डीकडे मार्गस्थ होत आसतो. पालखी सोहळा गेली ३० वर्षा पासुन सुरू आसुन यंदाचे हे ३१वे वर्ष आहे. हा सोहळा प्रतिवर्षाप्रमाने याही वर्षी २२ जानेवारी बुधवार रोजी सकाळी १० वाजता ढोल ताश्या, लेझीम, टाळ मृदंगाच्या गजरात, फटाक्याची अतिषबाजी करत साईनामाच्या घोषात हभप गोडबोले महराज जोगाईवाडीकर यांच्या हस्ते प्रस्थानकरुन शेकडो साईभक्तासह मार्गस्थ झाला आहे. पालखी सोहळा मार्गस्थ होण्यापुर्वी प्रथम पालखी अध्यक्ष हभप गोकुळ महाराज वैष्णव व कुटूंबीयांच्या हस्ते श्री पारायण, श्री साई पादुका मंगलस्नान, पुजापाट, काकडा आरती, तिर्थ प्रसादाचे वाटप करण्यात आले.ढोल ताश्या, लेझीम, टाळ



मृदंगाच्या गजरात, फटाक्याची अतिषबाजी करत साईनामाच्या घोषातहा सोहळा दुपारी अंबानगरीत शेकडो साईभक्तासह दाखल झाला. या वेळी शहरात पालखी मार्गावर ठिकठीकाणी रांगोळी काढुन रस्ते शुशोभिकरण करण्यात आले होते. सोहळ्यातील साईभक्तांचे शहरात जल्लोषात स्वागत करून अल्पोहार, चहापाण्याची तर मंगळवार पेठेतील साई मंदीराच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. साईनमाच्या जयघोषाने अंबानगरी भक्तीमय झाली होती. श्री योगेश्वरी मातेचे दर्शन घेऊन हा सोहळा सायंकाळी शिर्डीच्या दिशेने चनई मुक्कामी मार्गस्थ झाला. या सोहळ्यात जिल्ह्यातून शेकडो साईभक्त सहभागी झाले आसुन हा सोहळा धारुर,वडवणी,बिड,गेवराई, उमापूर, शेवगाव, नेवासा, श्रीरामपूर, राहता मार्गे १ फेब्रुवारी रोजी सांयकाळी ७ वाजता शिर्डीत पोहचणार आहे. सोहळा यशस्वीतेसाठी पालखी अध्यक्ष हभप गोकुळ महाराज वैष्णव, हभप सुंदरराव सोनवने वडवणीकर, संतोष महाराज राऊत, दादा राऊत केजकर, जिजा रामावत, विजय शितोळे, सुशील जोशी, प्रमोद पोखरकर, बबलू भराडीय,वाजेदबाब पठाण, भिम वैष्णव

## फातिमा शेख यांचे काल्पनिक पात्र म्हणणाऱ्या दिलीप मंडल हकलपट्टी करा.- सज्जाद सय्यद

पाटोदा (प्रतिनिधी)

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या खांद्याला खांदा लावून मुलींना शिक्षण देण्याचे काम त्यांचे सहकारी म्हणून शिक्षिका फातिमा शेख यांनी केले. तसेच उस्मान शेख यांनी०१ मे १८४९ रोजी पुणे येथे प्रौढ शिक्षणनाची स्थापना केली होती. त्यामध्ये सुद्धा माता सावित्रीबाई फुले यांनी अध्यापन कार्य केले. सावित्रीबाई फुले यांच्या मैत्रिण व सहकारी शिक्षिका फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्या अनुपस्थितीमध्ये शाळा सांभाळण्याचं काम केलं. उस्मान शेख व महात्मा फुले यांचे विचाराची मैत्री होती. आणि उस्मान शेख यांची बहीण शिक्षिका फातिमा शेख मुस्लिम समाजातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. त्यांच्या अनेक ग्रंथात माता सावित्रीबाई फुले व माता फातिमा शेख व शाळेतील मुली सह अनेक दुर्मिळ फोटो आजही उपलब्ध आहेत. अनेक ग्रंथात त्यांचा उल्लेख आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीवर केंद्रीय माहिती प्रसारण सल्लागार दिलीप




मंडल यांनी हे काल्पनिक पात्र आहे. असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे मुस्लिम, बहुजन समाजासह सत्यशोधक चळवळीला गालबोट लागत आहे. शिव-शाहु- फुले - आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये हे विधान खपवून घेतले जाणार नाही. या वक्तव्याचा आम्ही जाहीर निषेध करून दिलीप मंडल यांची हकालपट्टी करा. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक - सज्जाद सय्यद, मानवाधिकारचे शेख इम्रान नूर मा. उपविभागीय अधिकारी यांच्या कडे निवेदन द्वारे करण्यात आली आहे.

## कृषी महाविद्यालय आष्टी येथे शेतीमाल आयात निर्यात एक दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

आष्टी / प्रतिनिधी

शेतीमालाच्या जागतिक बाजारपेठेत शेतकऱ्यांना आणि कृषी व्यवसायाला अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी येथील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय शेतीमाल आयात निर्यात प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आयात क्षेत्रातील व्यवहारिक आणि तंत्रज्ञान देण्यात आले.

या कार्यशाळेची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे जागतिक स्तरावर शेतीमालाची मागणी असलेल्या उत्पादनांचे विश्लेषण, आयात निर्यात प्रक्रियेतील तांत्रिक बाबी व आवश्यक कागदपत्रांची माहिती, सरकारी योजना आणि



सवलतींचा लाभ घेण्याचे मार्गदर्शन, डिजिटलीकरणाचा शेतीमाल निर्यातीत उपयोग असा होता. प्रमुख प्रशिक्षक अमरनाथ अंदुरे यांनी विद्यार्थ्यांना आयात - निर्यात प्रक्रियेतील अडचणीवर मात करण्याचे उपाय सांगितले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी समजून घेतल्यास आणि योग्य तांत्रिक ज्ञानासह शेती मालाची गुणवत्ता वाढवण्यात भारताच्या कृषी उत्पादनांना अधिक प्रसिद्धी मिळू शकतो असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेचे महत्त्वपूर्ण उद्दिष्टे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर शेतीमाल व्यापारी ओळख करून देणे त्यासाठी आवश्यक कौशल्य विकसित करणे आणि त्यांना उद्योजक साठी प्रेरित करणे या उद्देशाने करण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रात नव नवीन संधी मिळण्याच्या दिशा मिळाली आहे. भविष्यात हेच विद्यार्थी आयात निर्यात क्षेत्रात यशस्वी उद्योजक म्हणून इतिहास रचतील असा विश्वास प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ यांनी व्यक्त केला. तसेच ही कार्यशाळा यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी प्रशिक्षण व रोजगार विभाग प्रमुख प्रा. महेश साबळे आणि कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत यांनी महाविद्यालयाच्या या पुढाकाराचे कौतुक केले आणि अशा प्रकारच्या उपकरणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होईल असे मत व्यक्त केले.




## लोकमान्य टिळक विद्यालयात ई-कचरा जनजागृती व संकलन अभियानाचे उद्घाटन

अंबाजोगाई / प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ई-यंत्रण २०२५ व भा.शि. प्र.संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण गतीविधीच्या माध्यमातून पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात दि.२२ जानेवारी २०२५ बुधवार रोजी ई-कचरा जनजागृती आणि संकलन अभियानाचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.संजयराव विभूते यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी सर्व शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.

या अभियानाच्या माध्यमातून प्रार्थना सभेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना तसेच गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ई-कचरा म्हणजे काय? त्याचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम,त्याचे संकलन याबाबत जनजागृती करण्यात आली. या अभियानात प्रत्येकाने सक्रीय सहभाग घ्यावा आणि गावात देखील याची जनजागृती करून सर्वांनी जास्तीत जास्त ई-कचऱ्याचे संकलन करावे असे विद्यालयाच्या वतीने अभियान प्रमुख श्री.संजयराव विभूते आणि स्वयंसेवक श्री.नितीन चौधरी यांनी आवाहन केले. सदरील अभियानातून जमा होणाऱ्या ई-कचऱ्याचे संकलन विद्यालयात दि.२६ जानेवारी २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे.

# ज्येष्ठ पत्रकारांनामिळणार १ एप्रिल पासून २० हजार रूपये सन्माननिधी

### उप मुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी घोषणा, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पत्रकार संवाद यात्रेचे यश

मुंबई/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकारांसाठी मोठी आनंदवार्ता आहे.राज्य सरकारने ज्येष्ठ पत्रकारां साठी मिळणाऱ्या सन्मान निधीत मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.उपमुख्यमंत्रीअजित पवार यांनी नुकतीच घोषणा केली की,दि.१ एप्रिल २०२५ पासून ज्येष्ठ पत्रकारांना २० हजार रुपये सन्माननिधी दिला जाईल.सध्या हा सन्माननिधी ११ हजार रुपये असून या निर्णया मुळे पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.गेल्या काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार संवाद यात्रेचे हे फलित आहे. नागपूर येथून सुरू झालेल्या या संवादयात्रेची सांगता मंत्रालय,मुंबई येथे झाली.या यात्रेचेआयोजन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष श्री. वसंत मुंडे आणि राज्य सरचिटणीस डॉ.विश्वास राव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखालीकरण्यात आले होते.दिक्षाभुमी ते मंत्रालयपत्रकार संवाद यात्रेला महाराष्ट्रभरातून मोठा प्रतिसाद मिळाला.यामध्ये दैनिकांचे संपादक,विक्रेते, प्रतिनिधी,वरिष्ठ पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले.मंत्रालयात आयोजित समारोप सोहळ्याला चंद्रकांत पाटील,पंकजा मुंडे,मंगल प्रभात लोढा यांसारख्या मान्यवरांसह सरकारच्या प्रतिनिधींनी हजेरीलावली होती.यावेळी पत्रकार संघाने आपल्या मागण्या सरकारपुढे ठामपणे मांडल्या होत्या.पत्रकारांच्या मागण्यांवर विचार करून राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली.



## फुलसांगवीत सप्ताह सांगतेला भाविकांचा महापूर ; महाप्रसादाची पंगत

### महंत जनार्धन महाराजांच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

मानूर । प्रतिनिधी

श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथीनिमित्त मौजे फुलसांगवी येथे गेल्या सात दिवसापासून मोठ्या आनंदी उत्साह मध्ये पार पडत असलेले अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज महंत जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. सांगतेच्या या कार्यक्रमासाठी संत - महंत, धार्मिक,सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह हजारोंच्या संख्येने फुलसांगवीनगरी भाविक -भक्तांचा महापूर आला होता. या उपस्थित भाविकांसाठी फुलसांगवी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाची पंगत देण्यात आली होती.

' वैराग्याचे महामेरू ' श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या जन्मभूमी मध्ये ( फुलसांगवी येथे ) श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती वै. महंत निगमानंद महाराज यांच्या प्रेरणेतून भाऊंच्या पुण्यतिथी निमित्त महाराजांच्या मार्गदर्शनाखाली आरंभीत केलेला अखंड हरीनाम सप्ताहाचा आज वटवृक्ष झालेला पाहायला मिळत आहे. आपल्या गुरुवर्यांची परंपरा विद्यमान गुरुवर्य महंत जनार्दन महाराज यांनी सांभाळत या परंपरेला खत पाणी घालण्याचे काम चालवले आहे.याच परंपरेला अनुसरुण फुलसांगवीत गेल्या सात दिवसापासून महाराजांच्या प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शनाखाली भव्य स्वरूपामध्ये अखंड हरीनाम सप्ताह व श्रीमद्भागवत कथा नामयज्ञ सोहळा मोठ्या थाटात पार पडत होता. त्याची सांगता आज महंत जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे.सप्ताह दरम्यान काकडा भजन, विष्णूसहस्त्रनाम गीतापाठ, तुकाराम महाराज गाथा भजन, हरिपाठ यासह हभप. ज्ञानेश्वर महाराज बोगीर (नाशिक ),तुकाराम महाराज मुंडे (परळी ) महादेव महाराज राऊत( म्हाळस जवळा ), सुधाकर महाराज वाघ (पैठण ), रविदास महाराज सिरसाट (आळंदी ), योगीराज महाराज गोसावी (पैठण ), प्रभाकर महाराज बोधले आदी नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन केले होते. त्याच बरोबर दुपार च्या भाविक भक्तांना ज्ञानमृताचे प्रबोधन मिळावे यासाठी हभप. महंत रामेश्वर महाराज शास्त्री ब्रम्हसंस्थान येळंब यांची श्रीमद् भागवत कथा आयोजित केली होती. ही कार्यक्रम श्रवण करण्यासाठी हजारोच्या संख्येने भाविक भक्त गेली आठ दिवस फुलसांगवी वास्तवास होती यामुळे फुलसांगवीनगरीत आनंदाला उधाण येऊन गोकुळाचे स्वरूप आले होते.या आनंदाच्या सोहळा सांगता आज महाराजांच्या कीर्तनाने झाली आहे. या सांगतेच्या कार्यक्रमाला हभप. महंत रामेश्वर महाराज शास्त्री, उद्धव महाराज शास्त्री,

सुरेशानंद महाराज, महेशदेवा शास्त्री, हरी महाराज घाडगे, महादेव महाराज घुंगरड, गणेश महाराज जरांगे, दिनकर महाराज खामकर,नशिकेत महाराज जरे, लक्ष्मण महाराज जरांगे,गिरीधारी महाराज शेळके , हरिदेवा जहागीरदार, अंनत देवा धसे, भाऊसाहेब महाराज इंगोले, माणिक महाराज मार्कड,जिप. सदस्य रामराव खेडकर, बबनराव गवते, इंजि.राहिदास पानसंबळ, योगगुरू अविनाश आर्य, मेजर चव्हाण नारायण पाटील देवकर, बाळासाहेब नागरे आदी सह धार्मिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय मान्यवरांसह भाविक भक्तांचा महापूर आला होता. या सांगतेच्या कार्यक्रमानंतर गावकऱ्यांच्या वतीने बुंदी आणि चिवड्याच्या प्रसादाची महापंगती देण्यात आली आहे. या पंगतीचा भाविक भक्तांनी मोठ्या श्रद्धेने लाभ घेतला आहे.

श्री संत वामनभाऊ महाराज यांची पुण्यतिथी म्हणजे एक परिसरासाठी मोठा धार्मिक उत्सव असतो. एरवी माहेरी येण्यासाठी वेळ नसणारे फुलसांगवी सह परिसरातील नांदायला गेलेल्या लेकी बाळी श्री संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथी सोहळा उत्सवाला वेळ काढून हजेरी लावतात. भाऊंचा दर्शन घेऊन या ठिकाणी आपल्या सोयीनुसार राहून येथील कार्यक्रमाचे श्रवण करतात. विशेष म्हणजे बाल मैत्रिणी ही या उत्सवा निमित्तानं एकमेकीला भेटून हितगुज करत असतात.

## खोलेश्वर महाविद्यालयातआजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित दोन दिवशीय कार्यशाळेचे उद्घाटन

प्रतिनिधी (अंबाजोगाई)

खोलेश्वर महाविद्यालय, आंबेजोगाई व डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित दोन दिवशीय व्यवसाय व समुपदेशन कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले .या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली .आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ . बाळासाहेब मुंडे यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले .

त्यांनी आपल्या प्रस्ताविकात ही दोन दिवशीय समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्याचा उद्देश सांगितला. आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग निर्माण करण्या पाठीमागील हेतू काय आहे तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण व्हावे जीवन जगताना आवश्यक असणारे मूल्य विद्यार्थ्यांच्या मनावरती रुजविण्यासाठी शिक्षण दिले जाते .त्यामध्ये ग्रामीण पत्रकारिता , ग्रंथालयाचा कोर्स यासारख्या विविध स्वरूपाचे कोर्स या विभागाच्या माध्यमातून राबविले जाते . असे त्यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ . सुधाकर शेंडगे या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, आजीवन शिक्षण ही काही तरी वेगळी गोष्ट आहे. विद्यार्थी खरंच शिक्षण घेत आहेत का त्यातील १०% टक्के विद्यार्थी हे मला काही तरी शिकायचे आहे असे विद्यार्थी आहेत तर बाकीचे ९०% टक्के विद्यार्थी हे डिग्री पूर्ण करण्यासाठी शिक्षण घेत आहेत .ते पुढे बोलताना म्हणाले की ,शिक्षण क्षेत्रामध्ये मुलांपेक्षा मुलींचे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे या मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व सावित्रीबाई यांनी दाखवून दिले. शिक्षण खरे कुठे आहे ते सांगताना पुढे म्हणाले की, शिक्षण घेत असताना संस्काराची गरज आहे खरे शिक्षण हे वर्गाच्या बाहेर आहे चार भिंतीतील शिक्षणापेक्षा वर्गाच्या बाहेरील शिक्षण हे कधीही कौशल्य विकसित करणारे असते .

कोणत्याही वर्गात नापास होणे म्हणजे शिक्षण संपले असे नाही तर नापास झालेली माणसे सुद्धा इतिहास घडवू शकतात असे त्यांनी आपले मत या प्रसंगी मांडले. यश मिळण्यासाठी जिद्द चिकाटी विश्वास असला पाहिजे आजीवन शिक्षण विभागाने कौशल्य शिक्षण याची सुरुवात केली आहे . छोटे छोटे कोर्सेस निर्माण केले आहेत. त्याद्वारे शिक्षण घेऊन विद्यार्थी स्वतःला सिद्ध करून रोजगार मिळवतात पुढे बोलताना म्हणाले की ,रोज नवीन गोष्टी आत्मसात करायला शिका त्यामुळे तुमचे भविष्य उज्वल होईल असे या प्रसंगी त्यांनी सांगितले .

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिपक फुलारी सर हे आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना म्हणाले की, शिक्षण शाळा - महाविद्यालयातील शिक्षणावर अवलंबून न राहता बाहेरील




कौशल्य आधारित शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या पायावर उभा राहिले पाहिजे असे त्यांनी मत अध्यक्ष समारोपत बोलताना केले .यानंतर पहिल्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा . सतीश हिवरेकर यांनी 'नवीन शैक्षणिक धोरण' याविषयी आपले विचार मांडले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की , भारताचे शैक्षणिक धोरण उच्च प्रतीचे होते. त्यात प्रामुख्याने तक्षशिला व नालंदा विद्यापीठ मधून हे शिक्षण दिले जात होते त्या विद्यापीठामधून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले होते .मात्र स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी येथील शिक्षण पद्धती मुळापासून संपवण्यासाठी प्रयत्न केले व त्यासाठी त्यांनी इंग्रजी शैक्षणिक धोरण इथे रूजविण्यासाठी प्रयत्न केले.

शिक्षकांत काही बदलासाठी नवीन शैक्षणिक धोरण निर्माण केले. १९८६ चे नवीन शैक्षणिक धोरण आले त्यात ३५ वर्षे हे शिक्षण सुरू होते. त्यानंतर बहिस्थ शिक्षणास सुरुवात झाली . काळ बदलला आवश्यक गरजा बदलल्या त्यानुसार हे शिक्षण बदलावे लागले त्यामुळे त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचे काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यही याप्रसंगी सांगितली. पुढे म्हणाले की, शैक्षणिक धोरणातील असलेल्या बदलानुसार मातृभाषेतून शिक्षण असले पाहिजे असे या नवीन शैक्षणिक धोरणात मान्य करण्यात आले आहे .ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. त्यांना त्यांच्या आवडीचे विषय घेता आले पाहिजेत तसेच भारताची ज्ञान परंपरा मोठी आहे. त्या परंपरेचा वापर या शैक्षणिक धोरणात झाला पाहिजे. असे मत त्यांनी याप्रसंगी मांडले.

शेवटी या सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ . बिभीषण फड यांनी या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला .दुसऱ्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी विभागाचे प्राध्यापक गौतम गायकवाड यांनी लेखन व संभाषण कौशल्य याविषयी आपले विचार मांडले. या विषयावर बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्यासाठी लेखन आणि संभाषण कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे . म्हणून कौशल्य शिक्षण घेऊन आपण आपल्या पायावर उभे राहू शकता. ज्ञानाच्या बरोबर कौशल्य शिक्षण घेणे आवश्यक आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनीआपल्या संभाषण व लेखन कौशल्यावर विशेष भर देऊन ज्ञान मिळविले पाहिजे असे मत त्यांनी या प्रसंगी मांडले .या सत्राचे अध्यक्ष वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ .सुभाष पटेकर यांनी अध्यक्षीय समारोप केला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा.रमण झरीकर यांनी केले . या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्रचार्य डॉ . कुंबेफळकर, उपप्राचार्य डॉ बिभीषण फड ,उपप्राचार्य डॉ .फुलारी सर ,प्राध्यापक बंधू-भगिनी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडनजीक होणारा उड्डाणपूल ३ पदरीऐवजी ६ पदरी होणार

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीनंतर पालकमंत्री ना.अजितदादा पवार, धनंजय मुंडेकडून मोठा बदल

प्रतिनिधी। बीड

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या निविदा विभागाने काढल्या होत्या. परंतु त्यामध्ये आता मोठा बदल होणार असून ३ पदरीऐवजी ६ पदरी उड्डाणपूल दोन्ही बाजूने उभारण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विभागाला निर्देश दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून या कामी पाठपुरावा सुरु केला आहे.



सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल तयार केला तर हे अपघात टाळता येतील, असा प्रस्ताव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडे गतवर्षी दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर केला. त्यांनतर इतर प्रक्रिया पूर्ण होऊन निविदाही निघाल्या होत्या. परंतु हे उड्डाणपुलाचे काम ३ पदरी होणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. त्यातही अनेक त्रुटी होत्या. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कानावर हा प्रकार घातला. त्यांच्या माध्यमातून अजितदादा पवार यांच्यासमोर हा प्रश्न मांडला. त्यानंतर सुचनेची दखल घेऊन त्यांनी संबंधित विभागांच्या अधिकार्यांना योग्य त्या सर्व सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत.

### भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन नवा बदल

भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मांडलेली सूचना कौतुकास्पद आहे. या सुचनेची दखल घेऊन राज्य शासनाने योग्य ती पाऊले उचलण्यास सुरुवात देखील केली आहे. या कामाबद्दल अजितदादा पवार, धनंजय मुंडे यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

# महायुतीचाच मंत्री म्हणतोय देवेंद्र सरकार शापित !

## खा. नीलेश लंके यांचा गौप्यस्फोट जल जीवनच्या कामातील भ्रष्टाचाराचाही पुनरूच्चार

अहिल्यानगर ( प्रशांत बाफना):- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील सरकार हे शापित असल्याचे सरकारमधील मंत्रीच सांगत असल्याचा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार नीलेश लंके यांनी केला आहे.

यासंदर्भात मंगळवारी खा. नीलेश लंके यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, हे माझे मत नाही तर महायुती सरकारमधील एका बडया मंत्र्याचे आहे. दरम्यान, खा. लंके यांनी केलेल्या या गौप्यस्फोटामुळे हा बडा मंत्री कोण याची चर्चा राज्यात सुरू झाली आहे. महायुती सरकार राज्यात सत्तेवर आल्यानंतर प्रदीर्घ कालखंडानंतर गेल्या शनिवारी विविध जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. विशेषतः नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भाजपाचे नेते गिरीष महाजन यांच्याकडे तर रायगडच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदीती तटकरे यांच्याकडे सोपविण्यात आली. या दोन्ही जिल्हयातील पालकमंत्री पदे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला हवी होती. नाशिकमध्ये दादा भुसे तर रायगडला भरतशेठ गोगावले यांनी या पदांवर हक्क सांगितला होता. नाशिक तसेच रायगडचे पालकमंत्रीपद न मिळाल्याने एकनाथ शिंदे हे संतापून सातारा जिल्ह्यातील त्यांच्या दरे या गावी निघून गेले. शिंदे यांच्या संतापानंतर दोन्ही पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली. या पार्श्वभुमीवर खा. नीलेश लंके यांनी आपली भूमिका मांडली.

ईव्हीएमच्या जोरावरचे सरकार टिकत नसते !महायुतीमधील एका बडया मंत्रयाने पत्रकारांशी खाजगीत बोलताना राज्यातील देवेंद्र सरकार शापित असल्याचे विधान केले आहे. ईव्हीएमच्या जोरावर निवडून आलेल्या लोकांना पाडण्याचे व पडलेल्या लोकांना निवडून आणण्याचे काम करण्यात आले आहे. ईव्हीएमच्या जोरावर सत्तेवर आलेले सरकार कधीही टिकत नसते.

# शंभर टक्के अंधत्व असलेल्या रुग्णाची पत्रकार शेख हमीद यांच्या पुढाकाराणे झाले मोठ्या गाठीचे ऑपरेशन

## रुग्णाच्या आई,दोन भाऊ, व नातेवाईकाने मानले पत्रकार शेख हामीद यांचे मानले आभार

मजालगाव ।प्रतिनिधी

लोकसेवा संकल्प सा.प्रतिष्ठान चे संवस्थापक अध्यक्ष व दै.सूर्योदय वृतपत्राचे प्रतिनिधी शेख हमीद हे नेहमी समाज सेवा करण्या मधे आग्रेसर असतात व समाजसेवेत अग्रेसर असणारे दोन-चार दिवसापासून ते बीड जिल्हा रुग्णालय येथे आपल्या नातेवाईकाच्या उपचारासाठी चार ते पाच दिवस बीडला मुक्कामी राहत असताना.

दिनांक २१/०१/२०२४रोजी(४)नंबर वार्डमधे एका रुग्णाजवळ सहज़ बसुन त्यांना विचार पूस केली तर रुग्णाच्या नातेवाईकाने सांगितले की १)गौतम कल्याण गायकवाड रा.मादळमोही ता.गेवराई जी.बीड हे माझे भाऊ आहे त्यांच्या अवघड जागेवरच्या गाठिचे ऑपरेशनकरण्यासाठी आम्ही मादळमोही येथून बीड जिल्हा रुग्णालय येथे आले आणि विशेष म्हणजे ते १००%टक्के अंधत्व आहे.ऑपरेशन लवकरात लवकर होऊन आम्ही घरी जावे असे आम्हाला वाटते.



त्याच वेळी शेख हमीद यांनी आपली माणुसकी दाखवत आपल्या जवळच्या नातेवाईकाला सोडून त्यांनी संबंधित पेशंटला आपले नातेवाईक समजून त्वरित डॉ.राऊत यांच्याशी संपर्क व चर्चा करुन विनंती केली आणि दुसऱ्याच दिवशी ऑपरेशन करुन घेतले

व इथेचन थांबता त्यांची सुट्टी होई पर्यंत जेवणाची सुद्धा सोय करुन दिली. यामुळे बीड जिल्ह्यात व महाराष्ट्रात पत्रकाराबद्दल अनेक टिपणी होतात की पत्रकार हा फक्त लेखणीतून किंवा आपल्या वर्तमानपत्रातून बातम्या द्वारे समाजाला न्याय देतो परंतु आज हे सुद्धा सिद्ध झाले की ग्राउंड लेव्हलवर राहून पत्रकारिता करता येते

# येवती यात्रेच्या कुस्ती फडात लातुरच्या लवटेने मारली बाजी !

## शेवटची कुस्ती उदगीरच्या धिरजचा पराभव करित लातुरच्या तुषार लवटे जिंकली !

मुखेड ।प्रतिनिधी

नांदेडच्या मुखेड तालुक्यातील येवती येथील सुप्रसिध्द श्री. सद्गुरू नराशाम महाराज यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या कुस्ती फडात शेवटची कुस्ती आठ हजार रुपयेची लातुरच्या तुषार लवटेने जिंकली असुन त्यांनी उदगीरच्या धिरजचा पराभव केला आहे. श्री सद्गुरू नराशाम महाराज यात्रेनिमित्त दरवर्षी यात्रा कमेटी व समस्त गावकरी मंडळ यांच्या वतीने कुस्त्यांचे आयोजन केले जाते. यंदा दि. २१ जानेवारी २०२५ रोजी जंगी कुस्त्यांचे भव्य आयोजन केले होते. या आखाड्यात यंदा कुस्ती खेळण्यासाठी मराठवाड्यातील प्रसिद्ध हिंद केसरी पैलवान दाखल झाले होते. तर दुसरीकडे कुस्ती प्रेमींनीही कुस्त्या पहाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.





श्री सद्गुरू नराशाम महाराज यात्रेनिमित्त कुस्त्यांचे नियोजन गावातील पद्माकर पाटील येवतीकर, पंढरी पाटील गोपनर, रंजीत पाटील गोपनर, वसंतराव पाटील येवते, निळकंठराव सुभेदार, शिवाजी पिंपरे, हाणमंतराव पा सुडके, देविदास गुरुजी सुडके, बंडू पाटील सुडके, शिवाजी गुरुजी सुडके, संदीप पा सुडके, नरहरी नागरगोजे, शामराव नागरगोजे, संतोष सावकार, श्रीहरी पाटील नागरगोजे, पत्रकार विठ्ठल पाटील येवतीकर, राम शेट सुडके , डॉ.कोंडिबा सुडके, कार्यकर्ते ज्ञानोबा पुंडलिक घाटे, शेख मैनोदीन येवतीकर , लक्ष्मण पाटील गोपनर , अखिल येवतीकर आदी मान्यवरांकडून केले जाते. यंदा अतिशय चांगल्या प्रकारे कुस्त्या शांततेत पार पडले असून यावेळी. मुखेड पोलिस ठाण्याचे कर्तव्य दक्ष पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे साहेबांच्या आदेशाने बिट जमादार व्यंकट जाधव यांनी चोख असा बंदोबस्त ठेवला होता . तर दुसरीकडे गावकऱ्यांच्या वतीने पोलिस प्रशासनाचे आभार

# विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत विविध व्यावसायिक कौशल्य जतन करणे महत्त्वाचे - प्रो. डॉ.सुधाकर शेंडगे

माजलगाव ।प्रतिनिधी

आजच्या काळात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत विविध व्यावसायिक कौशल्य देखील जतन करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक प्रो. डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालय आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भा. शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड हे तर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या ॲड.डॉ. योगिता होके पाटील, प्राचार्य प्रो.डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते.




पुढे बोलताना प्रो. डॉ. सुधाकर शेंडगे म्हणाले की, सध्याचे शिक्षणातील चित्र हे विचित्र असे दिसत आहे. आज-काल विद्यार्थ्यांचा शिक्षणाला जणू काही बाहेरून पाठिंबा असल्याचे जाणवत आहे. शैक्षणिक प्रक्रियेमध्ये ही गोष्ट अत्यंत खेदाची आहे. आजच्या विद्यार्थ्याला शिकायचे तर आहे पण वर्गात बसायचे नाही. मग वर्गात न बसता शिक्षण प्रक्रिया कशी पूर्ण करता येईल बरे? तर यासाठीच विद्यापीठाने आजीवन शिक्षण व विस्तार विभाग सुरू केला आहे व या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तसेच त्यांच्यामध्ये असणाऱ्या विविध कौशल्यांचा विकास करण्याचे काम हा विभाग करत असल्याचे ते म्हणाले. ॲड. डॉ. योगिता होके पाटील म्हणाल्या की, आजच्या विद्यार्थ्यांचा विकास हा निरंतर पद्धतीने झाला पाहिजे. करलो दुनिया मुठी में असे म्हणणारे या जगातील विद्यार्थी हे सर्वकेंद्रीत शिक्षण घेऊन पुढे गेले पाहिजेत. प्राचार्य प्रो. डॉ. मुकुंद देवर्षी यांनी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्रकाश दुगड म्हणाले की, कोणताही मनुष्य हा आयुष्यभर विद्यार्थीच असतो त्याने शिक्षणाच्या प्रवाहात कितीही ज्ञान घ्यायचे ठरवले तरी अजन्म पुरेल असे ज्ञान या जगामध्ये उपलब्ध आहे. प्रास्ताविक प्रा. अशोक होके यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांनी केले तर आभार आय.क्यू.ए.सी. विभागाचे समन्वयक डॉ. विनायक देशमुख यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप-ठाकरेंची छुपी यूती बहुजनांसाठी घातक- डॉ.हुलगेश चलवादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'बॅलेट पेपर'वर घेण्याची मागणी

हिंदुत्वादी विचारधारेवर राजकीय वाटचाल करणारा भाजप आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची छुपी यूती बहुजनांसाठी घातक असल्याचा दावा बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी सोमवारी (ता.१३) केला. बहुजनांच्या मतविभाजनासाठी करण्यात आलेल्या महाविकास आघाडीच्या प्रयोगात भाजप यशस्वी झाला आहे. महाप्रचंड विजयानंतर आता पुन्हा भाजप-उद्धव ठाकरे सोबत येणार असल्याचे चित्र दृष्टीपथात येत असल्याचा दावा देखील डॉ.चलवादींनी केला.



सत्ताधारी आणि विरोधक जेव्हा 'समविचारी' असतात तेव्हा सामाजिक बदलाची आणि समतेची अपेक्षा केली जावू शकत नाही.प्रस्थापित राजकीय पक्षांनी सदैव बहुजनांची अवहेलनाच केली आहे. साम-दाम-दंड-भेद नितीचा वापर करून ते बहुजनांना सत्तेपासून दूर ठेवतात. राजकारणातील बहुजनांचा राजकीय 'अनुशेष' संपवायचा असेल, तर बहुजन समाज पक्ष एकमेव 'विचारपीठ'असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. मान्यवर कांशीराम जी आणि उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री सुश्री बहन मायावती जी यांच्या 'सर्वजन हिताय,सर्वजन सुखाय' या विचारानूसार तळागाळातील पीडित, शोषित, वंचित आणि उपेक्षितांना 'शासनकर्ती जमात'बनवायचे असेल, तर प्रस्थापितांविरोधात एकत्रित राजकीय लढा द्यावाच लागेल.

ईव्हीएमची खेळी करीत मतदारांचे मत हस्तगत करणार्या पक्षांना यंदा बहुजन समाज जागा दाखवेल. निवडणूक आयोगाने होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर घ्याव्यात, अशी मागणी देखील डॉ.चलवादी यांनी केली.बहुजन समाज पक्ष भाजप, शिवसेना असो वा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला त्यांच्या बहुजन विरोधी प्रयोगात आता यशस्वी होवू देणार नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बसपा तळागाळातील जनमानसात जात प्रस्थापित राजकीय पक्षांचे मनसुबे बहुजनांसमोर मांडणार आहे.

मुंबई प्रतिनिधी : रमाकांत मुंडे

# आकाश शेट्टीने आयोजित केलेल्या साई उत्सवात ईशा कोप्पीकर आणि हेमा शर्मा उपस्थित होते

आझाद भगतसिंग युवा मोर्चा, आकाश शेट्टी यांनी आयोजित केलेल्या साई उत्सवाला बॉलिवूड स्टार्सनी हजेरी लावली गोरेगाव येथील अण्णा भाऊ साठे मैदानावर आकाश शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आझाद भगतसिंग युवा मोर्चाने 'द्वारका साई उत्सव २०२५' हा भव्य कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला.ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशनचे युवा अध्यक्ष आकाश शेट्टी यांच्या देखरेखीखाली आयोजित कार्यक्रमात, अभिनेत्री ईशा कोप्पीकर, बिग बॉस फेम हेमा शर्मा यांच्यासह बॉलिवूड आणि टीव्ही जगतातील अनेक तारे आणि शेकडो कलाकारांनी साई भजन संध्यामध्ये भाग घेतला आणि प्रसाद घेतला.ईशा कोप्पीकर म्हणाली, मी नेहमीच साईनाथांची कट्टर भक्त आहे. आजही मी येथे श्री साईनाथ महाराजांचे आशीर्वाद घेण्यासाठी आली आहे. आकाश शेट्टी खूप चांगले काम करत आहे. या भक्तीमय वातावरणात ईशा भक्तांमध्ये गेली. .स्वतःच्या हातांनी प्रसाद वाटला.



माध्यमांशी बोलताना आकाश शेट्टी म्हणाले, दरवर्षीप्रमाणे, यावेळीही श्री साईनाथ महाराजांच्या आशीर्वादाने 'श्री द्वारका साई उत्सव' आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जात आहे. यासाठी योगदान देणाऱ्या सर्व शुभचिंतकांचे आम्ही आभार मानतो. या भव्य कार्यक्रमाचे आभार. दरवर्षी हा उत्सव अधिक भव्यतेने साजरा केला जाईल याची खात्री करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

बिग बॉस-१८ ची स्पर्धक असलेली अभिनेत्री हेमा शर्मा म्हणाली, बिग बॉसमध्ये जाण्यापूर्वी मी साईबाबांना प्रार्थना केली होती, जी पूर्ण झाली. मी साईबाबांची एकनिष्ठ भक्त आहे. त्यांच्यामुळेच हा कार्यक्रम घडत आहे. आशीर्वाद. ज्याचे माध्यम आकाश भास्कर शेट्टी जी आहेत. हा एक वार्षिक उत्सव आहे जो दरवर्षी आझाद भगतसिंग युवा मोर्चा द्वारे साईबाबांच्या भक्तांसाठी आयोजित केला जातो ज्यामध्ये हजारो भाविक सहभागी होतात आणि महाप्रसाद घेतात.

छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई